cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष -४ | अंक-५८ | शनिवार दि.८ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### पटनायक यांना भाजपशी मैत्री अंगलट!

प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याने आपली नगण्य ताकद असलेल्या त्या राज्यात स्वत:चे अस्तित्व निर्माण करायचे, हळूहळू स्वत:साठी पूरक वातावरण तयार करून आपल्या पक्षाची ताकद वाढवत जायचे आणि नंतर ज्यांच्या सहकार्याने, मदतीने आपण उभे राहिलो त्या प्रादेशिक पक्षालाच आव्हान द्यायचे ही भाजपच्या अलीकडल्या काळातील राजकारणाची रीत बनली आहे. शिवसेना, अकाली दल यांसारख्या भाजपच्या कित्येक वर्षांपासून मित्रपक्ष राहिलेल्या प्रादेशिक पक्षांसह विविध राज्यांतील अनेक छोट्या-मोठ्या पक्षांना भाजपच्या या 'गरज सरो वैद्य मरो' या राजकारणाचा पुरेपूर अनुभव आलेला आहेच.

### देशाच्या विकासात कोणतीही कमी ठेवणार नाही - नरेंद्र मोदी

नवी दिल्लीः १८ वी लोकसभा देशाच्या विकासासाठी महत्त्वाची आहे. एनडीए सरकारला देशाची सेवा करण्याचा जनतेचा आशिर्वाद मिळाला आहे. आमच्या सरकारच्या सलग तिसऱ्या कार्यकाळात देशाच्या विकासात कोणतीही कमी ठेवणार नाही,' असे प्रतिपादन संसदीय पक्ष आणि एनडीएचे नेते नरेंद्र मोदी यांनी केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी राष्ट्रपती भवनाच्या बाहेर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.मोदी पुढे म्हणाले की, 'आझादी का अमृत महोत्सवानंतरची ही पहिलीच निवडणूक आहे.

# दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही-काँग्रेस


## नवनिर्वाचित खासदारांनी आपल्या मतदारसंघातील दुष्काळी भागाचा दौरा करून आधार द्यावा- नाना पटोले



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात सध्या भीषण दुष्काळ असून जनता या दुष्काळाने होरपळून निघाली आहे. हंडाभर पाण्यासाठी महिलांना पायपीट करावी लागत आहेत तर जनावरांना चारा नाही. महाभ्रष्टयुती सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडले आहे परंतु काँग्रेस पक्ष जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. काँग्रेसच्या नवनिर्वाचित खासदारांनी आपापल्या भागातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून शेतकरी व जनतेशी संवाद साधावा, अशा सूचना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्या आहेत.**

टिळक भवनमध्ये शुक्रवारी काँग्रेसच्या नवनिर्वाचित खासदारांची बैठक झाली या बैठकीत दुष्काळावर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले की, जनतेने काँग्रेस पक्षावर मोठा विश्वास दाखवलेला आहे. दुष्काळाने संकटात सापडलेल्या जनतेच्या पाठीशी सरकार उभे राहत नाही असे चित्र आहे परंतु काँग्रेस पक्ष जनतेचे प्रश्न हाती घेऊन सरकारला जाब विचारेल. दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून केंद्र सरकार बरोबरच राज्य सरकारकडेही मदतीसाठी पाठपुरावा केला जाईल, त्यासाठी खासदारांनी आपल्या मतदारसंघात दुष्काळी भागाचा दौरा करून आढावा घ्यावा. दुष्काळग्रस्तांशी संवाद साधून त्यांना आधार द्यावा तसेच प्रशासनाकडे पाठपुरावा करून दुष्काळग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असा सल्लाही दिला.



# मनोज जरांगे उपोषणावर ठाम

## » अंतरवाली सराटीत पोलिसांचा बंदोबस्त



**जालना।प्रतिनिधी**

**अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली आहे. मात्र तरीही शनिवारपासून आमरण उपोषण करणारच असल्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.**

जरांगे म्हणाले की, 'शनिवारी सकाळी १० वाजता उपोषणाला सुरुवात होणार असून परवानगी दिली अथवा नाकारली तरी उपोषण होणार आहे. आम्हाला परवानगीची आवश्यकता नाही. हे आंदोलन २९ ऑगस्टपासून सुरू आहे. मध्यंतरी सरकारने आश्वासन दिले. म्हणून आंदोलन स्थगित केले

◀◀ पान २ वर

### हल्ले करा, डोके फोडा मात्र उपोषण करणारच

ते पुढे म्हणाले की, गृहमंत्री फडवणीसांनी किती हल्ले करायचे ते करावेत. आमची डोकी फोडायची ती फोडा, मात्र आम्ही उपोषणावर ठाम आहोत. उपोषण होणार मराठ्यांच्या मागण्यासाठी हे आंदोलन होणारच. मला अटक केली तरीही मी जेलमध्ये उपोषण करणार. मला उपोषण करण्यापासून कोणीही अडवू शकत नाही, असा इशारा देत जरांगे-पाटील यांनी 'सरकार जातीय सलोखा बिघडवण्याचे काम करत आहे. आंदोलनाच्या विरोधात निवेदने देत आहेत. तर मराठ्यांना निवेदने देता येत नाहीत का? कुणी कितीही विरोध केला तरी शनिवारपासून आंदोलन सुरू होणार', असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## » भाजपाकडून विधानसभेची तयारी...

# मोदी मंत्रीमंडळात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला चार तर अजित दादांच्या राष्ट्रवादीला दोन मंत्रिपदाची शक्यता

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**मोदी सरकारचा मंत्रिमंडळ फॉर्म्युला समोर आला असून, त्यामध्ये शिवसेना शिंदे गटाला आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला लॉटरी लागण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला केंद्रात चार मंत्रिपदं तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला दोन मंत्रिपदं मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. तर रामदास आठवलेंनाही मंत्रिपद मिळणार आहे. केंद्रात महाराष्ट्राला एकूण ११ मंत्रिपदं मिळणार आहेत. महाराष्ट्रात** होवू घातलेल्या विधानसभा







**निवडणुकिची तयारी भाजपाकडून केली जात असून, त्याचाच हा एक भाग असल्याचे बोलले जात आहे.**

राज्यात भाजपचे नऊ खासदार असून त्यापैकी पाच जणांची केंद्रात मंत्रिपदावर वर्णी लागणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवसेना शिंदे गटाचे ७ खासदार निवडून आले असून केंद्रात त्यांना चार मंत्रीपदं मिळण्याची शक्यता आहे. त्यामध्ये दोन कॅबिनेट तर दोन राज्यमंत्रिपदं मिळणार आहेत. कल्याणचे खासदार आणि मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे, बुलढाण्याचे खासदार प्रतापराव जाधव किंवा मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यापैकी दोघांची कॅबिनेट मंत्रिपदी वर्णी लागू शकते. तर राज्यमंत्री म्हणून नरेश म्हस्के, धैर्यशील माने यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून राज्यसभेचे

◀◀ पान २ वर

### फडणवीस यांचा राजीनामा लांबणीवर

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातून मुक्त करण्याची मागणी पक्षश्रेष्ठींकडे केली होती. यानंतर त्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक नेत्यांनी मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु, ते आपल्या निर्णयावर ठाम होते. शहा यांनी समजूत घातल्यानंतर तूर्तास फडणवीस यांचा राजीनामा लांबणीवर पडल्याचे सांगण्यात येत आहे.

दि. ७ रोजी दिल्लीत केंद्रीय मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर फडणवीस यांनी राजीनामा देऊ नये असा सल्ला शहा यांनी दिल्याचे सूत्रांकडून

◀◀ पान २ वर

# पिपाणीमुळेच साताऱ्याची जागा भाजपने जिंकली

## ■ वाद निवडणूक आयोगाकडे जाणार, जयंत पाटील यांची माहिती





**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकांच्या निकालात यंदा महाविकास आघाडीने बाजी मारली आहे. महाविकास आघाडीने सर्वाधिक ३० जागा जिंकल्या असून महायुतीने केवळ १७ जागांवरच विजय मिळवला. मात्र, निवडणुकांची रणनिती, प्रचार आणि प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या पराभवासाठी डावपेच आखताना अनेकांनी आपल्या निवडणूक चिन्हाशी मिळते-जुळते चिन्ह देऊन उमेदवार उभे केल्याचे पाहायला मिळाले. अर्थातच काही उमेदवारांना याचा मोठा फटका बसला असून अनेकांचे सीट धोक्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसला दोन मतदारसंघात याचा फटका बसला असून सातारा आणि दिंडोरी मतदारसंघातील उमेदवारांना याचा तोटा झाल्याचे राष्ट्रवादीने म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे

◀◀ पान २ वर

### हा रडीचा डाव - सुप्रिया सुळे

जर पिपाणी नसती तर आमची साताऱ्याचीही सीट आली असती. दिंडोरीतही पिपाणीला मते पडली आहेत. हा रडीचा डाव आहे, दुसरं काही नाही. मी दहा वर्षे भाजपचे सरकार पाहिलं आहे, असे खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. बारामती लोकसभेत विजय मिळवल्यानंतर सुप्रिया सुळेंनी दौंडमध्ये जात लोकांचे आभार मानले. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत निवडणुकीबाबत भाष्य केले. यावेळी त्यांनी निवडणूक उमेदवारांचे चिन्ह असलेल्या पिपाणी व तुतारी यावर भाष्य केले.

# केज मध्ये शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला काळिमा ३ हजारांची लाच घेताना मुख्याध्यापक जाळ्यात

**केज । प्रतिनिधी**

**ट्रान्सफर सर्टिफिकेटच्या दुसऱ्या प्रतीसाठी ३ हजारांची लाच घेताना केज शहरातील एका शाळेच्या मुख्याध्यापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ ताब्यात पकडले. ही कारवाई शुक्रवारी (दि.७) दुपारी शाळेच्या आवारात करण्यात आली.**

केज शहरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक धनराज सखाराम सोनवणे (रा.सारणी आनंदगाव,ता. केज) यांनी त्यांच्या शाळेतील एका माजी विद्यार्थ्याने १२ वी उत्तीर्ण झालेल्या टीसी ची द्वितीय प्रत मागणीसाठी अर्ज केला होता. त्यासाठी मुख्याध्यापक धनराज सोनवणे यांनी त्यांच्याकडे ३ हजारांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानंतर विद्यार्थ्याने बीड येथील लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानुसार मुख्याध्यापकाला रंगेहाथ पकडण्यासाठी सापळा लावण्यात आला. शुक्रवारी दुपारी लाचखोर मुख्याध्यापकाला माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज या शाळेच्या प्रवेशद्वारावर तक्रारदार विद्यार्थ्याकडून ३ हजारांची लाच घेताना रंगेहाथ ताब्यात घेतले. केज येथे मागील आठवड्यात तहसीलदार आणि कोतवाल यांच्यावर २० हजारांची लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ताजी असतानाच ही घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. ही कारवाई लाचलुचपत विभागाचे पोलीस निरीक्षक युनुस शेख यांनी छत्रपती संभाजी नगरच्या लाचलुचपत

◀◀ पान २ वर

# सुरेश कुटे, अर्चना कुटे चौकशीसाठी पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**



**ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेचे प्रमुख सुरेश कुटे आणि सौ.अर्चना कुटे यांना बीड पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. बीड नंतर त्यांना माजलगाकडे घेवून जाण्यात आले.**

तिरूमला ग्रुप आणि द कुटे ग्रुप वर ऑक्टोबर २०२३ मध्ये इन्कम टॅक्स विभागाने कारवाई केली. त्यानंतर अचानक सुरेश कुटे यांच्या ज्ञानराधा मल्टीस्टेट पतसंस्थेत गडबड सुरु झाली. अचानक पतसंस्थेच्या अनेक शाखा बंद झाल्या, ठेवीदारामध्ये गोंधळ निर्माण झाला. गेल्या आठ महिन्यात सुरेश कुटे यांनी पैसे परत करण्यासाठी अनेकवेळा तारखा जाहीर केल्या,

◀◀ पान २ वर

# कृषिमंत्री ना.मुंडे पुन्हा कार्यरत; खरिपाच्या तोंडावर कृषी विभागाचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात कृषी विभागाच्या सचिवांसह सर्व प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला.**




यावर्षी खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरने वाढ झाली असून बियाण्यांच्या व खतांच्या पुरवठ्याबाबत सुद्धा सूक्ष्म नियोजन केले जात आहे. सध्याची एकूण बियाणे मागणी ही १८ लाख क्विंटल इतकी असुन वाढलेल्या क्षेत्राचा विचार करून राज्य शासनाने सर्व पीके मिळून २४ लाख क्विंटल बियाणे मंजूर केले आहे. त्यापैकी १३ लाख क्विंटल वितरित केले असून आणखी ६ लाख क्विंटल वितरणाच्या स्थितीत आहे तर उर्वरित बियाणे देखील वेळेत वितरीत केले जाईल, असे नियोजन केले जात आहे. राज्यात कुठेही बी-बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृषी सेवकापासून ते कृषी अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी डोळ्यात तेल घालून कृत्रिम टंचाई निर्माण केली जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

सर्व प्रकारचे बियाणे शेतकऱ्यांना योग्य भावात मिळावेत तसेच खतांचा मुबलक साठा व त्याचे योग्य वितरण यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्यात येईल. बी-बियाण्यांची चढ्या भावाने विक्री,

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०७ जून २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १४.०० क्विंटल | २,२२६ | ३,१०१ | २,४६९ |
| ज्वारी/हायब्रिड: १६८.५० क्विंटल | १,८०० | ४,४६० | २,३८६ |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,८१० | ७,८१० | ७,८१० |
| तूर : ८.०० क्विंटल | ११,१९९ | ११,४०१ | ११,३२५ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | २,३०१ | २,७०१ | २,४८५ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: २००.५० क्विंटल | ४,४७५ | ४,५२१ | ४,४९२ |
| हरभरा: १९.५० क्विंटल | ५,८०० | ६,६०१ | ६,२६३ |

# राज्यभरात पावसाचा येलो अलर्ट


## राज्याच्या आणखी काही भागात मान्सून दाखल होणार

**पुणे । प्रतिनिधी**

**गुरुवारी मान्सूनने राज्यात प्रवेश केल्यानंतर शुक्रवारी त्याच जागेवर मुक्काम केला. पण मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे त्यामुळे पुढील चार दिवस राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.**

मान्सूनने गुरुवारी राज्यातील सिंधुदुर्ग, सांगली आणि कोल्हापूर जिल्हा व्यापला होता. तसेच रत्नागिरी आणि सोलापूर जिल्ह्याच्या काही भागात तो दाखल झाला. कर्नाटक, तेलंगणा, किनारी आंध्र प्रदेशच्या आणखी काही भागात मान्सूनने प्रगती केली. अरबी समुद्राचा आणखी काही भाग तसेच बंगालच्या उपसागरात बहुतांशी भागात मान्सून पोहचला. मान्सूनची सिमा रत्नागिरी, सोलापूर, मेडक, भद्राचलम, विजयानगरम भागात होती. मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील ३ ते ४ दिवसांमध्ये मान्सून महाराष्ट्राच्या आणखी काही भागात दाखल होण्याची शक्यता आहे. तर संपूर्ण कर्नाटक आणि आंध्र प्रदेश तो व्यापेल असाही अंदाज आहे. तेलंगणा, छत्तीसगड, ओडिशा आणि बंगालच्या उपसागराचा आणखी काही भाग मान्सून व्यापेल असेही अंदाज हवामान म्हटले आहे.

राज्यात पावसासाठी पोषक हवामान आहे. राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश आणि विदर्भातील काही भागात पुढील चार दिवस पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.



cmyk

cmyk



अग्रलेख

# पटनायक यांना भाजपशी मैत्री अंगलट !

प्रादेशिक पक्षांच्या सहकार्याने आपली नगण्य ताकद असलेल्या त्या राज्यात स्वत:चे अस्तित्व निर्माण करायचे, हळूहळू स्वत:साठी पूरक वातावरण तयार करून आपल्या पक्षाची ताकद वाढवत जायचे आणि नंतर ज्यांच्या सहकार्याने, मदतीने आपण उभे राहिलो त्या प्रादेशिक पक्षालाच आव्हान द्यायचे ही भाजपच्या अलीकडल्या काळातील राजकारणाची रीत बनली आहे. शिवसेना, अकाली दल यांसारख्या भाजपच्या कित्येक वर्षांपासून मित्रपक्ष राहिलेल्या प्रादेशिक पक्षांसह विविध राज्यांतील अनेक छोट्या-मोठ्या पक्षांना भाजपच्या या 'गरज सरो वैद्य मरो' या राजकारणाचा पुरेपूर अनुभव आलेला आहेच. अनेक प्रादेशिक पक्ष भाजपच्या या राजकारणाने राज्यातील आपली राजकीय ताकद व मतपेढी गमावून बसले तर काही पक्षांचे तर अस्तित्वच धोक्यात आले आहे. मात्र जगातला सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून मिरवणाऱ्या भाजपची विस्ताराची भूक मात्र संपताना दिसत नाही. भाजपच्या याच राजकारणाच्या बळींच्या यादीत आता बिजू जनता दलाचे नवीन पटनायक यांचा समावेश होताना दिसतो आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीसोबत चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकाही पार पडल्या. त्यात चार राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन राज्यांत स्वबळावर तर एका राज्यात मित्र पक्षासह सत्ता प्राप्त केली आहे. ज्या दोन राज्यांत भाजपला स्वबळावर सत्ता मिळाली त्यात अरुणाचल प्रदेश व ओडिशा या दोन राज्यांचा समावेश होतो. अरुणाचलमध्ये भाजपने सत्ता कायम ठेवण्याची कामगिरी केली मात्र ओडिशातील भाजपचा विजय मात्र लक्षणीय आहे. ओडिशात मागच्या अडीच दशकांपासून 'अजेय' मानल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री नवीन पटनायक व त्यांच्या बिजू जनता दलाला पूर्णपणे पराभूत करून भाजपने स्पष्ट बहुमत प्राप्त केले व पूर्व भारतात आपला झेंडा फडकाविला आहे. वास्तविक या निवडणुकीपूर्वी भाजप व बिजू जनता दल यांच्यात युतीची बोलणी सुरू होती. तब्बल १७ दिवसांच्या जागा वाटपाच्या चर्चेनंतर ही बोलणी फिसकटली आणि भाजपने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. १४७ सदस्यीय विधानसभेत ७८ जागा तर लोकसभेच्या २१ पैकी २० जागा जिंकून भाजपने या राज्यात निर्भेळ यश संपादन केले. शेजारच्या पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी भाजपचा विजय रथ रोखलेला असताना मागच्या २४ वर्षांपासून ओडिशात 'अजेय' राहिलेल्या नवीन पटनायक यांना मात्र दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्या मागे पटनायक यांनी सातत्याने भाजपशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहकार्याची घेतलेली भूमिकाच शेवटी त्यांच्या अंगलट आल्याचे पाहायला मिळते. १९९७ ते २००८ या काळात बिजू जनता दल व भाजप हे ओडिशात मित्र पक्ष होते. सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्या काळात पटनायक सरकारमध्ये भाजपच्या वतीने मंत्री होत्या. ओडिशाच्या मागास भागात धर्मांतर मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची ओरड सुरू झाल्यावर ते रोखण्यासाठी म्हणून बजरंग दल सक्रिय झाले. याच दरम्यान ऑस्ट्रेलियन धर्मप्रचारक ग्रॅहम स्टेन्स व त्यांच्या दोन मुलांची जानेवारी १९९९ मध्ये जिवंत जाळून निर्घृण हत्या करण्यात आली. तेव्हापासून बजरंग दल, भाजप व रा.स्व. संघाने ओडिशात हातपाय पसरण्यास सुरुवात केली. २००८ मध्ये कंधमहल जिल्ह्यात हिंदू-ख्रिश्चन असा हिंसक संघर्ष झाला होता व त्यात ३० पेक्षा जास्त लोकांचा बळी गेला होता, हजारो लोक विस्थापित झाले होते. यानंतर नवीन पटनायक यांनी भाजपची 'थेट साथ' सोडण्याचा निर्णय घेतला. मात्र संसदेत व संसदेबाहेरही सातत्याने भाजपला अनुकूल व सहकार्याचीच भूमिका घेतली. संसदेत अनेक वेळा संख्याबळाने अडचणीत सापडलेल्या भाजपला पटनायक यांनी सहकार्य करून अडचणीतून बाहेर काढले. अगदी अलीकडे राज्यसभेच्या ३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपकडे पुरेशी मते नसतानाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवडून आणण्यासाठी पटनायक यांनी भाजपला मदत केली होती. मात्र हीच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भाजपला सहकार्य करण्याची भूमिका आता पटनायक व त्यांच्या पक्षाच्या मुळावर उठली आहे.

भाजपने या वेळच्या निवडणुकीत बरोबर संधी साधून नवीन पटनायक व बिजू जनता दलाच्या मुळावर घाव घातला. विशेष म्हणजे हा घाव घालताना राष्ट्रीय पक्ष असणाऱ्या भाजपने चक्क प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा पुरता तापवून प्रादेशिक पक्ष असणाऱ्या बिजू जनता दलास 'चेकमेट' केले. अलीकडे ७७ वर्षीय नवीन पटनायक यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे हिंडण्या-फिरण्यावर मर्यादा पडल्या होत्या. त्यांचे सचिव व सनदी अधिकारी व्ही. के. पंडियन हे प्रशासन व राजकारण अशा दुहेरी वर्तुळात महत्त्वाची भूमिका बजावत होते. स्वेच्छानिवृत्ती स्वीकारून पंडियन यांनी अधिकृतपणे बिजू जनता दलात प्रवेश केल्यावर पटनायक यांचे पक्षातील उत्तराधिकारी पंडियनच आहेत ही भावना पक्षात व जनतेतही दृढ होऊ लागली होती. पटनायक अविवाहित असल्याने व पंडियन यांचे पक्षातील स्थान बळकट होत असल्याने हा समज दिवसेंदिवस घट्ट होत चालला होता. पंडियन हे मूळचे तामिळी. यामुळे ओडिशाची सूत्रे तामिळीच्या हाती देणार का? असा प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा भाजपने चाणाक्षपणे उचलून धरला. मोदीपासून सर्वच भाजप नेत्यांनी प्रचारात हा मुद्दा प्रचंड तापविला. एवढेच नव्हे तर मोदी यांनी पटनायक यांच्या प्रकृती स्वास्थ्याबद्दल शंकाही उपस्थित केल्या. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात ही निवडणूक राज्यात याच मुद्यावर केंद्रित झाली तेव्हा पटनायक यांना आपली प्रकृती उत्तम असल्याचा व पंडियन आपले पक्षातले उत्तराधिकारी नसल्याचा खुलासा करावा लागला. मात्र तोवर खूप उशीर झाला होता व भाजपने आपला कार्यभाग साधला होता. त्यातून स्वत: पटनायक यांनाही निवडणुकीत पराभव चाखावा लागला व बिजू जनता दलाची २४ वर्षांची राज्यातील 'अजेय' सद्दी संपुष्टात आली. भाजपने या राज्यात निर्विवाद यश प्राप्त केल्याने पटनायक व त्यांच्या बिजू जनता दलासमोर आता अस्तित्वाचाच प्रश्न उपस्थित झाला आहे. थोडक्यात भाजपने वेळ येताच ज्याप्रमाणे शिवसेना, अकाली दल, भारत राष्ट्र समिती, आसाम गण परिषद, महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, अण्णा द्रमुक आदी प्रादेशिक पक्षांना जागा दाखवून दिली. त्याचप्रमाणे आता पटनायक व त्यांच्या बिजू जनता दलालाही त्यांची जागा दाखवून देण्यास व 'अब की बारी..पटनायकांची बारी'! हे सिध्द करण्यास सुरुवात केली असल्याचे दिसते.

# प्रस्थापित ओबीसी नेत्यांनो सावधान...!

एकेकाळी सर्व जात, धर्म, पंत विसरून रझाकारांच्या विरोधात लढलेला मराठवाड्यातील पुरोगामी विचारांचा बीड जिल्हा आता जातीयवाद करत असल्याचे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतून प्रकर्षाने जाणवले. हे आत्ताच झाले असे नाही तर २००९ च्या लोकसभा निवडणुकी पासून ओबीसी विरुद्ध मराठा अशी निवडणूक बीड जिल्ह्यातील मतदारांना पहायला मिळत आहे!

नुकत्याच पार पडलेली लोकसभा निवडणुकही त्याला अपवाद राहिला नाही तर यावेळी जातीयवादाने उच्चांक गाठत महायुती व महाविकास आघाडी जिंकण्यासाठी प्रयत्न करताना स्पष्ट दिसत होते आणि ही अत्यंत निंदनीय बाब आहे!

नेहमी प्रमाणे सत्ताधारी प्रस्थापित ओबीसी व मराठा समाजकारणात व राजकारणात नसलेल्या भोळ्या भाबड्या विस्थापित ओबीसी व मराठा समाजातील लोकांना या राजकीय जातीय दरीत टाकून बळी पाडण्यासाठी प्रयत्नशील होता.

कधीही राजकारण न करणारा विस्थापित मराठा व ओबीसी समाज बांधव स्वतःच्या समाजाचा खऱ्या अर्थाने आजपर्यंत काय मिळाले आणि काय नाही, याचं आत्मचिंतन आता करु लागला, असेच बीड लोकसभेच्या निकालातुन दिसले!

जिल्ह्यात तीन नंबरची लोकसंख्या असलेल्या धनगर समाजाचा एकेकाळी बीड लोकसभेचा खासदार होता पण आजची धनगर समाजाची राजकीय परिस्थिती काय?

तर गेल्या ३५ वर्षापासुन ओबीसीतील ठराविक एकाच समाजाच्या छत्रछायेखाली असलेल्या बीड नगर पालिकेच्या ५२ सदस्य असलेल्या संख्याबळापैकी कोणत्याही पक्षाकडून गेल्या ३५ वर्षांपासून एकही धनगर समाजाचा सदस्य झाला नाही, नव्हे होऊ दिला जात नाही. याचा विचार धनगर समाजाचा सुशिक्षित युवा मतदार अंतर्मुख होऊन करु लागला आहे.

काही धनगर व माळी समाजाच्या संघटनाही आहेत, पण त्याही स्वतःच्या समाजापेक्षा प्रस्थापित ओबीसी असलेल्या थोरल्या आणि धाकल्या घराच्या फायद्यासाठीच आहेत, हेही लपून राहिलेले नाही! आणि त्या प्रस्थापितांच्या फायद्यासाठी काम केले नाही तर त्यांनाही अडचणीत आणण्यासाठी हे प्रस्थापित ओबीसी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाहीत.

म्हणजे एक प्रस्थापित ओबीसी बांधव तुपाशी असेल तर विस्थापित ओबीसी बांधवाला चटणी भाकरी तरी मिळाली पाहिजे ही भूमिका आजपर्यंत सत्तेत कायम बसलेल्या सदन ओबीसी समाजाच्या म्होरक्यांनी कधीच घेतली नाही.

खरंच सत्तेत वाटा नसणार्या ईतर ओबीसी बांधवांना बिलकुल कळत नसायला आजचा सुशिक्षित बेरोजगार विस्थापित ओबीसी तरुण आता काही अनपढ नाही.

तो तरुण या सर्व नफ्या-तोट्याचा विचार विनिमय करु लागला आहे! का उगाच ओबीसी आहे म्हणून नेहमीच सत्तेत बसणार्या ओबीसी बांधवांना नाही रे वर्गातील ओबीसी बांधवांनी आणखी किती वर्षे हेच मढं उरावर घेऊन नाचायचं...? याचा विचार सत्तेत नसलेले ओबीसी मतदार कधी करणार आहेत का नाही ?

बीडच्या थोरल्या प्रस्थापित ओबीसी घराने जो अन्याय केला तीच री पुढे ओढत परळीच्या धाकल्या प्रस्थापित ओबीसी घरानेही कायम पुढे चालू ठेवला.

३२ नगर परिषद सदस्य संख्या असलेल्या परळी नगर परिषदेत पण स्व.गोपीनाथराव मुंडे राजकारणात सक्रिय व्हायच्या अगोदरच धनगर समाजाचा १ व माळी समाजाचे २ सदस्य होते व आहेत व त्यांची संख्या त्याच्या पुढे कशी जाणार नाही याची काळजी नेहमीच आजपर्यंत घेतली गेली आहे!

अगदी २०१७ मध्ये परळी तालुक्यातील नागापूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये धनगर समाजाच्या प्रदिप दिलीप बीडगर यांना भाजपने उमेदवारी दिली होती व त्याच्या विरोधात वंजारी समाजाच्या प्रदिप मुंडेना राष्ट्रवादीने उमेदवारी दिली होती, पण या निवडणुकीत बीडगर यांच्या विरोधात मुंडेचा दोन्ही पक्षातील प्रस्थापित समाज एकत्र झाला आणि बीडगर यांचा पराभव केला होता, हे परळी तालुक्यातील सर्व जनतेने उघड्या डोळ्यांनी बघीतले आहे. तसेच बीड तालुक्यातील पिंपळनेर जिल्हा परिषद सर्कलमध्ये २००७ साली धनगर समाजाचे गोरख शिंदे हे शिवसेनेचे उमेदवार होते तर राष्ट्रवादी काँग्रेसने १० गावात १० घरं नसलेल्या तेली समाजाचे चंद्रकांत पेंढारे हे उमेदवार दिले होते. त्यावेळी शिंदेचा पराभव करण्यासाठी मोठ्या क्षीरसागरांनी सर्व राजकीय ताकद पणाला लावून शिंदेना पराभूत केले होते, हेही बीड तालुक्यातील जनतेने बघीतले होते. नंतर २०१७ मध्ये बहिरवाडी जिल्हा परिषद गटाच्या निवडणुकीत काँग्रेस आयने कुणबी मराठा समाजाचे अशोक हिंगे यांना तिकीट दिले होते तर शिवसेनेने धनगर समाजाच्या नवनाथ प्रभाळे यांना उमेदवारी दिली होती तर राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (काकु नाना) आघाडीने तेली समाजाच्या सुरेखा क्षीरसागरांना उमेदवारी दिली होती.



भाई आकाश निर्मळ
मो.९४२२५३६९००

सरासरी समाजाचेच राजकारण बघायचे झाले तर प्रत्येक गांवात मराठा समाजाची लोकसंख्या किमान ४० % संख्या आहे तर या निवडणुकीत हिंगे हे विजयी व्हायला हवे होते. पण तसे अजिबात घडले नाही तर सरसकट गावात (काही अपवाद वगळता) कमीत कमी पाच व जास्तीत जास्त ३० घरे असलेल्या धनगर समाजाचे प्रभाळे विजयी व्हायला हवे होते! पण घडले ते उलटेच! दहा गावात तेली समाजाचे दहा घरं नसतानाही सुरेखा क्षीरसागर प्रचंड मतांनी विजयी झाल्या होत्या. याची उमज सत्तेत नसणार्या ओबीसी बांधवांना आता चांगलीच यायला लागली आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

का उगाचच लगीन आहे लोकांचं आणि नाचतयं येड्या भोकाचं ही भुमिका घेऊन विस्थापित ओबीसी बांधव आता उर बडवून घ्यायला काय दुधखुळा राहिला नाही.

आपण आता आपल्या स्वतःच्या समाजाच्या पुढील पिढ्यांचं राजकीय व सामाजिक नुकसान करून घेणार नाहीत, ही भुमिका आता विस्थापित ओबीसी तरुण जागा होऊन घेऊ लागला आहे.

विस्थापित ओबीसी आता स्वतःच्या जातीचं स्वतः अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करु लागला आहे

व दबक्या आवाजात म्हणू लागला आहे, 'आपण कोणालाच त्रासदायक ठरलो नाही तर आपला विचार कोणीच करणार नाही.'

जिल्ह्यात चार नंबरचा समाज असलेल्या माळी समाजाची पण अजिबात वेगळी परिस्थिती नाही. माजी आ. भिमराव धोंडे प्रथम कॉंग्रेसचं काम करत होते, पण प्रथम विधानसभा उमेदवारीसाठी कॉंग्रेस पक्षाचे तत्कालीन सत्ताधारी यांच्याकडे मागूनही नाकारली होती. म्हणून त्यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणूक लढविली होती. त्या पहिल्या निवडणुकीत धोंडेंना तत्कालीन सक्षम विरोधी पक्ष असलेल्या शेकापने निवडणूकीत पाठींबा दिला होता म्हणून ते निवडून निवडणूक सहजपणे जिंकले होते.

तेव्हा कुठे भीमराव धोंडेंच्या रुपाने समाजाला राजकीय पटलावर जिल्ह्यात तालुका लोकप्रतिनिधी बघायला मिळाला. कालांतराने ते कॉंग्रेस, राष्ट्रवादी व्हाया २०१४ ला भाजपमध्ये गेले व जिंकलेही, पण नंतर२०१९ ला त्यांचा पराभव झाला होता. तर परवाच्या नगर लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जामखेडच्या सभेत महाराष्ट्र भाजपचे सर्वेसर्वा व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडववणिसांनी आष्टी-पाटोदा विधानसभेचे उमेदवार म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचे विद्यमान आमदार सुरेश धसांच्या नावाची घोषणा करून भाजपने पुन्हा धोंडेंचेही पंख कोणाच्या सांगण्यावरून छाटले, हेही उमजायला मार्ग नाही.

सत्तेतील थोरल्या व धाकल्या प्रस्थापित घरातील जे आरोग्य व शिक्षण सभापती, जिल्हा परिषद उपाध्यक्ष झाले ते कालांतराने आमदार झालेले जिल्ह्यातील जनतेने पाहिले आहे. मात्र, माळी समाजाचे जेष्ठ नेते कॉम्रेड पंढरीनाथ (बापू) लगड पण एक वेळा आरोग्य व शिक्षण सभापती झाले होते, नंतर ते आमदार किंवा खासदार सोडाच नंतर ते जिल्हा परिषद सदस्य सुद्धा झाले नाहीत, का होऊन दिले नाहीत हा पण विचार आजचा राजकारणाच्या बाहेरचा ओबीसी तरुण करु लागला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

बीडमध्ये राष्ट्रवादीचं कायम काम करत असलेले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या अँड सुभाष राऊतांनाही वरीष्ठ पातळीवर दबाव आणल्याशिवाय स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने किंवा स्थानिक नेतृत्वाने साधे बीड नगर परिषदेचे तिकिट दिले नाही. हे काही लोकांना खरे वाटत नसेल तर कधी राऊतांना खाजगीत भेटुन विचारुन बघा, तुम्हाला नक्की सत्यता पडताळता येईल. याचा बदला आता झालेल्या लोकसभेत माळी समाजानेही घेण्याचा प्रयत्न केला, कारण समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते लोकसभा निवडणुकीचा प्रचार करताना कुठेही दृष्टीस पडले नाहीत.

वरील दोन्ही समाजाचे कधी जिल्हा नियोजन समितीवर सदस्य किंवा ईतर कमेट्यावर सदस्य नसतात असले तरी ते औषधापुरतेच असतात!

कधी काळी नाभिक समाजाचे स्वातंत्रसैनिक कॉम्रेड काशिनाथराव जाधव बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते, पण आज त्यांच्या समाजाचा साधा जिल्हा परिषद सदस्य किंवा पंचायत समिती सदस्य पण तूर्तास जिल्ह्यात नाही.

बहुसंख्य असलेल्या विस्थापित ओबीसीचे असे राजकीय व सामाजिक हाल आहेत तर कुंभार, कोष्टी, परीट, सुतार, लोहार, रंगारी, भावसार, लिंगायत वाणी, साळी, भविष्य सांगणारा जोशी समाज, गुरव, गोपाळ समाज, हिंदु, मुस्लिम कासार, मणियार, आतार, बागवान, नाथपंथी, गोसावी, डवरीगोसावी व ईतर सर्व छोट्या-छोट्या विस्थापित ओबीसी आणि भटके विमुक्त यांची राजकीय व सामाजिक व आर्थिक स्थिती किती दयनीय असेल ही कल्पना न केलेलीच बरी. बाकी गेवराई शहरात गेवराई ओबीसी विकास आघाडी उभी करणार्या प्रा. गणपतराव काकडेंना ओबीसी समाजाचे कार्य करताना प्रस्थापितांविरुद्ध लढा देताना किती त्रास झाला याचा अभ्यास आजचा विस्थापित ओबीसी तरुण जागृत होऊन करु लागला आहे. उशीरा का होईना पण आजचा विस्थापित ओबीसी तरुण जागा होताना दिसत आहे, हेही नसे थोडके!

माजलगांव, पाटोदा, आष्टी, शिरूर कासार, वडवणी इथेही वरील ओबीसी समाजाचे राजकीय लोकप्रतिनिधी तोंडी लावण्यापुरते पण का निवडुन येत नाहीत का किंवा निवडणुकीत उभेकेले जात नाहीत किंवा उभे राहिले तर स्थानिक पातळीवर विविध स्तरावरन दबाव आणून उभे राहू दिले जात नाही. याचा विचार सुज्ञ विस्थापित ओबीसी तरुण करु लागला आहे. दोन्ही प्रस्थापित ओबीसी नेत्यांपेक्षा मराठा समाजाचे आ. सुरेश धस कैकपटीने अधिक चांगले म्हटले तर कोणाला वाईट वाटण्याचे कारण नाही, कारण त्यांनी विविध समाजातील घटकांना न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसत आहे. बीड जिल्हा परिषद अध्यक्षांची सर्वसाधारणसाठी जागा राखीव असताना पण वंजारा समाजाच्या सविता गोल्हारांना व सय्यद अब्दुल्लांना तर ओबीसींसाठी आरक्षित असताना डॉ. शिवाजीराव राऊतांना जिल्हा परिषद अध्यक्षपद बहाल केले, हीच अध्यक्ष निवडण्याची संधी दोन्ही प्रस्थापित ओबीसींना मिळाली असती तर त्या दोघांनीही स्वतःच्या कुटुंबांतील कसा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडता येईल, याकरीता निकराचे प्रयत्न केले असते, हे त्रिवार सत्य कोणीही लपवू शकणार नाही. गेल्या ३५ वर्षापासून दोन्ही प्रस्थापित ओबीसी घरांनी जेवढे ओरबाडून खाता येईल तेवढं खाल्लं, याचीच उमज आजच्या विस्थापित ओबीसी नवतरुणांना झाली हे कालपरवा लागलेल्या बीड लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर स्पष्ट दिसून आले आहे.

आता तरी प्रस्थापित ओबीसी पुढाऱ्यांनों, सावधान व्हा सर्वांना समान वागणूक देत रहा ..! अन्यथा ओबीसीतील छोटछोट्या विस्थापित ओबीसी जाती स्वतःचा राजकीय वाटा घेण्यासाठी तुमची वाट लावल्याशिवाय गप्प बसणार नाहीत, हेच खरे !

## पान १वरून...

### भाजपाकडून विधानसभेची तयारी...

खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांच्यापैकी एकाला कॅबिनेट आणि एकाला राज्यमंत्री पद मिळण्याची शक्यता आहे. अजित पवार गटाला लोकसभेत सुनील तटकरेंच्या रुपात एक जागा मिळाली आहे. तर प्रफुल्ल पटेल हे राज्यसभेवर आहेत. दरम्यान, गेल्या दोन टर्ममध्ये मोदींच्या मंत्रिमंडळात मंत्री असलेल्या रामदास आठवले यांना तिसऱ्या टर्ममध्येही मंत्रिपद मिळणार आहे.

------------

### मनोज जरांगे उपोषणावर

होते. स्थगित केलेल्या आंदोलनाला पुन्हा परवानगीची आवश्यकता नसते. हे सरकार विसरते आहे का?' असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. 'आम्ही परवानगी मागणारच नव्हतो मात्र अंबडचे तहसीलदार यांनी स्वतः भेट घेऊन सांगितले की ८ जूनच्या उपोषणाचे निवेदन जिल्हाधिकारी आणि एस.पी. यांना द्या. आता तेच प्रशासनातील लोक परवानगी नाकरत आहेत. म्हणजे सरकारला जाणून-बुजून हे करायचे होते. परवानगी नाकारून अंतरवालीत बसलेल्या समाज बांधवांवर गृहमंत्र्यांना पुन्हा लाठी हल्ला करायचा आहे. माता माऊलींचे डोके फोडण्याचा सरकारचा, गृहमंत्र्यांचा डाव दिसतोय', असा आरोप जरांगे यांनी केला.

---------

### शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला काळिमा

विभागाचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत सुरेश सांगळे, श्रीराम गिराम, हनुमान गोरे, भरत गारदे, अविनाश गवळी, गणेश मेहेत्रे, स्नेहलकुमार कोरडे यांनी सहभाग घेतला.

-------------

### पिपाणीमुळेच साताऱ्याची

तक्रार करणार असल्याचे म्हटले. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० पैकी ८ जागांवर विजय मिळाला आहे. मात्र, पडलेल्या सातारा या जागेवरील उमेदवारांच्या पराभवाला पिपाणी हे अपक्ष उमेदवाराचे चिन्हच कारणीभूत असल्याचे राष्ट्रवादीने म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वच उमेदवारांना पिपाणी या अपक्ष उमेदवारांच्या उमेदवारीचा फटका बसला आहे. सरासरी ४५ ते ५० हजारांचे मतदान या पिपाणी या चिन्हाने घेतले आहे, विशेष म्हणजे पिपाणी या चिन्हाचे नाव तुतारी ठेवण्यात आले, त्यामुळे हा घोळ झाल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले. दिंडोरी आणि सातारा लोकसभा मतदारसंघात याचा मोठा फटका बसल्याचे त्यांनी सांगितले. दिंडोरी लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर मुरलीधर भगरे यांचा १ लाख १३ हजार १९९ मतांनी विजय झाला आहे. मात्र, येथील अपक्ष उमेदवार बाबू भगरे (सर) यांच्या पिपाणी या चिन्हासमोरील बटण दाबल्याने त्यांना १ लाख ३ हजार मते मिळाली आहेत. सातारा लोकसभा मतदारसंघातही पिपाणी चिन्ह घेऊन निवडणूक लढलेल्या अपक्ष उमेदवारास ३७ हजार ६२ एवढी मते पडली आहेत. तर, येथील विजयी उमेदवाराचे मताधिक्य ३२ हजार ७७१ एवढे आहे. त्यामुळे, साताऱ्यातील राष्ट्रवादीच्या उमेदवाराच्या पराभवास पिपाणी हे चिन्ह कारणीभूत असल्याचा दावा राष्ट्रवादीने केला आहे. यासंदर्भात आपण निवडणूक आयोगाकडे दाद मागणार असल्याचेही जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेतून सांगितले.

------------

### फडणवीस यांचा

सांगितले जात आहे. शहा यांनी शिंदे आणि पवार यांच्यासोबत सुमारे अर्धा तास बैठक घेतली. त्यानंतर फडणवीस यांनी शहा यांची भेट घेतली आणि तूर्तास राजीनामा देऊ नका. पंतप्रधान पदाचा शपथविधी सोहळा झाल्यानंतर यावर निर्णय घेऊ, तो पर्यंत राज्यात काम सुरूच ठेवा, असा सल्ला शहा यांनी फडणवीस यांना दिल्याचे सांगितले जात आहे.

-------------


### कृषिमंत्री ना.मुंडे पुन्हा कार्यरत;

कृत्रिम टंचाई इत्यादी बाबत शेतकऱ्यांना थेट तक्रार करता यावी व विभागाला व्यक्तिशः ती तक्रार सोडवता यावी, यासाठी मागील वर्षी प्रमाणे शासनाचा व्हाट्सप क्रमांक २४ तासात सक्रिय करून शेतकऱ्यांना कळवण्यात येईल. दुसरीकडे कृषी निविष्ठा दुकानांमधून चढ्या भावाने केली जाणारी विक्री, कृत्रिम टंचाई, बोगस बियाणे विक्री याबाबत विभागाने धडक कारवाया कराव्यात. शेतकऱ्यांनी तक्रारी करूनही एखाद्या ठिकाणी विभागाने कारवाई न केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. या बैठकीस कृषी विभागाच्या सचिव श्रीमती कुंदन, आयुक्त रावसाहेब भागडे, गुण नियंत्रण विभागाचे संचालक विकास श्री. पाटील, बी-बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक गोंदवले, महाबीजचे श्री. कलंत्री, कृषी विद्यापीठांचे बियाणे विभाग प्रमुख, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे पदाधिकारी प्रत्यक्ष व दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

--------------

### सुरेश कुटे, अर्चना कुटे

मात्र पैसे दिलेच नाही. त्यामुळे गेल्या महिन्यात माजलगाव, बीडसह अनेक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले. परंतु पोलीस त्यांना अटक करत नसल्याने पोलिसांच्या कारभारावर शंका उपस्थित केली जातं होती. शुक्रवारी पहाटे बीड पोलीसांनी पुण्यातील हिंजवडी येथील कुटे यांच्या घरी जाऊन त्यांना ताब्यात घेतले. त्यांना चौकशीसाठी बीड येथे आणण्यात आले आणि त्यानंतर माजलगावकडे नेण्यात आले. पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून, त्यांना अटक होणार की नाही याबाबत तकवितक लावले जात आहेत.



## नीट परीक्षा निकालातील घोळाची उच्चस्तरीय चौकशी करा - काँग्रेसची मागणी

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या (नीट) निकालात ६७ उमेदवारांना १०० टक्के गुण मिळाल्याचा घोळ झाल्याने या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केली आहे. निकालातील घोळासाठी मोदी सरकार जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.**

नीट व इतर परीक्षांमधील हुशार विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी या संपूर्ण घोळाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी खर्गे यांनी 'एक्स' वर केलेल्या पोस्टमधून केली आहे. काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वधेरा यांनीही 'एक्स'वर पोस्ट करून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. आधी नीट परीक्षेचा पेपर लीक झाला आणि आता निकालातही घोटाळा झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. एकाच परीक्षा केंद्रातील ६ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाल्याने अनेक गैरप्रकार उघडकीस आल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे प्रियांका गांधी यांनी म्हटले आहे.

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ८ जून २०२४ ३

## उप-अभियंता बोराडे व इंजि.ठाकूर यांची सखोल चौकशी होणार

### सार्वजनिक बांधकाम उपविभागामधील घोटाळा बाहेर निघणार - अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**


बीड येथील सार्वजनिक बांधकाम उप-विभागामध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. उप-अभियंता बोराडे यांचेकडे पदभार आल्यापासून बीड नगर पालिकेने वर्ग केलेली कामे केलीच नाहीत जी कामे केली ती अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे. तसेच अभियंता ठाकूर यांच्या कार्यकाळात २५१५ / २२२५ / () या कामामध्ये प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली आहे. दोघेही मागणी केलेली माहिती दडवून ठेवत होते सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता तोंडे यांच्याकडे लेखी तक्रार करत चौकशी करण्याची मागणी केली होती परंतु तोंडे यांनी सदर प्रकरणी आपल्या अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी पळवाट शोधत चौकशी करण्यास टाळाटाळ करत होते.

तदनंतर वंचितचे अजय सरवदे यांनी थेट अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय उस्मानाबाद यांच्याकडे थेट तक्रार केली होती. तक्रारीत नमुद बाबीच्या अनुषंगाने आपण स्वतः योग्य ती चौकशी करून वस्तुस्थिती अहवाल तात्काळ तक्रारदारास लेखी कळवावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ कार्यालयास सादर करावा अश्या आशयाचे आदेश कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम क्र-१ यांना काढले आहेत.

## हिंगणीमध्ये धाडसी चोरी, सोने चांदीसह नगद आठ लाखाचा मुद्देमाल लंपास

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**धारूर तालुक्यातील हिंगणी बु. येथे (दि.०३) सोमवारी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घरफोडी करून चोरट्यांनी तब्बल आठ लाख सोळा हजार एकशे पस्तीस रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली. घरातील जवळपास अकरा तोळे सोने, दोनशे पन्नास ग्रॅम चांदी व नव्वद हजार रुपये नगदी चोरट्यांनी चोरी करत पोबारा केला. सोमवारी दिंद्रुड पोलिस, बीड स्थानिक गुन्हे शाखा, ठसे तज्ञ, श्वानपथकाने घटनास्थळी भेट दिली.**



दिंद्रुड पोलीस हद्दीतील हिंगणी बु. येथील मंचक भाऊसाहेब सोळंके हे रविवारी (दि.०२) रात्री जेवण करून सोळंके कुटुंबीय झोपले असताना सोमवारी मध्यरात्री साडेबारा वाजता च्या सुमारास चार अज्ञात चोरट्यांनी सोळंके यांच्या घराच्या चॅनल गेट चे कुलूप तोडून आत प्रवेश करत, मंचक सोळंके यांच्या गुडघ्यावर लोखंडी मारतूल ने मारून चाकूचा धाक दाखवत सोने चांदी, पैसे कुठे ठेवल्याचे विचारले. कपाटातील सोन्याचे दागिने,चांदीचे जुने भांडे व बी-बियाणे भरण्यासाठी मित्राकडून हातउसने आणलेले नव्वद हजार रुपये नगदी असा एकूण ०८ लाख १६ हजार एकशे पस्तीस रुपयांच्या मुद्देमालावर डल्ला मारला. यामध्ये सोन्याचा मोहन हार, मिनी गंठण, नट अंगठी, गोठ अंगठी, बिंदल्या, चांदीचे छोटे-मोठे जुने भांडे या दागिन्यांसह रोख नव्वद हजार रुपये चोरट्यांनी लांबवले. चोरट्यांच्या मारहाणीत सोळंके यांच्या गुडघ्याला दुखापत झाली असून, हाताला जखम असताना चोरट्यांनी दयामया न दाखवता हातातील दहा ग्रॅमची अंगठी ओरबाडून घेतली. सर्व मुद्देमाल गुंडाळून चोरांनी तिथून पोबारा केला. घरातून चोर पळाल्यानंतर घाबरून गेलेल्या मंचक सोळंके यांनी गावातील काही तरुणांना फोन करत त्यांचा पाठलाग केला. मात्र दोन दुचाकी वर चाललेल्या चोरट्यांनी त्यांची कासारी मार्गे जात असल्याची दिशाभूल करत दिंद्रुड मार्गे पळ काढून फरार झाले. दरम्यान दिंद्रुड पोलीसांनी सोमवारी घटनास्थळी श्वान पथकासह, स्थानिक गुन्हे शाखा, ठसे तज्ञांनी भेट देत पंचनामा केला असून मंचक सोळंके यांच्या फिर्यादीवरून दिंद्रुड पोलिसात गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास सपोनि अण्णाराव खोडेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खरात करत आहेत.

## पवनचक्की पत्त्याच्या घरासारखी अर्ध्यातून तुटून कोसळली



**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोविंदवाडी शिवारातील पालख्या डोंगराजवळ असलेल्या टेंभी तांडा परिसरात २४ नंबर क्रमांकाची पवनचक्की आज, गुरूवारी सकाळी अचानक कोसळली. यात पवन चक्कीचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र, महाकाय पवनचक्की अचानक कोसळून पडल्याने खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील गोविंदवाडी परिसरातील पालख्या डोंगर व राजपिंपरी शिवारातील डोंगरावर काही वर्षांपूर्वी पनामा कंपनीने पवनऊर्जा प्रकल्प उभारला आहे. आज सकाळी गोविंदवाडी परिसरातील पालख्या डोंगरावरील टेंभीतांडा जवळील पवनचक्की अचानक कोसळून पडली. यात पवन चक्कीचे मोठे नुकसान झाले आहे. पवनचक्की अर्ध्यातून तुटून पडली आहे. त्याचे महाकाय पाती खाली तुटून पडत विखुरली गेली. सुदैवाने परिसरात कोणीही नव्हते त्यामुळे कुठलीही जीवितहानी झाली नाही. पवनचक्की कोसळण्याचे कारण अद्याप समजू शकले नाही. माहिती मिळताच पनामा कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी येथे भेट देऊन नुकसानीची पाहणी केली.

## महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रायोजित ‘महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा’

**टाकरवण । प्रतिनिधी**

**शेतकरी वर्गाला क कर्ज नुतनीकरण, व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहनपर योजनेचे महत्व पटवून सांगण्यासाठी व त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे दि.५ जून ते १५ जून दरम्यान आयोजन करण्यात येत आहे. संपूर्ण मराठवाड्यात तब्बल ५० ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येणार असून या दरम्यान तब्बल २००० नियमित पिक कर्ज धारकांचा सत्कार तसेच संपूर्ण यात्रेदरम्यान २००० झाडांचे वृक्षारोपण देखील बँकेमार्फत करण्यात येणार आहे.**



सदर यात्रा हि ता १० सोमवार रोजी किट्टीआडगाव येथे सकाळी आठ वाजता येणार असून त्या दरम्यान मशीन चे प्रात्यक्षिक तसेच आर्थिक समावेशन, डीजीटल साक्षरता आणि सामाजिक सुरक्षा योजनांबद्दल जनजागृती, नियमित पिक कर्ज धारकांचा सत्कार करण्यात येणार आहे. बँकेचे सर्व सन्माननीय ग्राहक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, बचत गटातील महिलावर्ग तसेच संबंधित शासकिय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी या सर्वांनी किट्टीआडगाव येथे येणाऱ्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेत मोठ्या संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत करण्यात आले आहे.

## आष्टी पत्रकार बांधवांचा महाबळेश्वरसह ऐतिहासिक स्थळ आणि देवदेवतांचा दर्शन सोहळा संपन्न

आष्टी । प्रतिनिधी

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हटल्या जाणाऱ्या पत्रकार बांधवांची लेखणी सातत्याने समाज हिताच्या दृष्टीने सुख, दुःख समाधान होऊन आपले कर्तव्य निभावत असते परंतु हे कर्तव्य करत असताना थकून भागून गेलेल्या जीवाला सीन हलका व्हावा आणि जगातील वेगवेगळ्या भागातील नयनरम्य प्रेक्षणीय स्थळांचा सहभाग लाभावा.या दृष्टिकोनातून आष्टी तालुक्यातील पत्रकार बांधवांनी नुकताच हा ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याचा योग एका सहलीच्या माध्यमातून आणला आहे.आष्टी येथील पत्रकारांची लेखणी सर्वाधिक व्यापक आणि विस्तृत स्वरूपात व्यक्त झालेली सर्वश्रुत आहे. राजकारण,समाजकारण,संस्कृती, धर्मशिक्षण आदीसह विविध क्षेत्रातील संशोधनात्मक बातम्या आणि लेख लिहिण्याची एक वेगळी चळवळ या पत्रकारांच्या वैशिष्ट्यांचा भाग आहे.विविध दैनिक,साप्ताहिक तसेच वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींच्या रूपातून तालुक्याच्या विविध भागातील दर्शन यानिमित्ताने सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी पत्रकार सदैव पुढे आहे.दरम्यान उन्हाळ्याच्या सुट्टीच्या अनुषंगाने आष्टी येथील पत्रकार दत्ताभाऊ काकडे,उत्तम बोडखे,भीमराव गुरव,प्रवीण पोकळे,शरद तळेकर, संतोष सानप,रघुनाथ कर्डीले,शरद रेडेकर,गणेश दळवी,सचिन रानडे, मनोज पोकळे या पत्रकारांनी आपल्या देशाच्या छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजीराजे यांनी घडवलेल्या किल्ल्यांच्या अभ्यास करण्यासाठी तसेच देव देवतांचे दर्शन घेऊन आशीर्वादासाठी त्यांनी सहलीचे आयोजन केले. आष्टीचे पत्रकारांची ही सहल महाबळेश्वर,तापोळा (मिनी काश्मीर),मांढरादेवी,वाईचा नवसाचा गणपती,पाचगणी येथील स्टाबरी बगांची पाहाणी,मप्रो कंपनीला भेट सातारा अजिंक्यतारा किल्ला दर्शन असा दौरा (सहल) पुर्ण करुन परतेल अशी माहिती महाबळेश्वर येथून ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी दिली.



## वृक्षारोपन करुन झाडांचे संवर्धन ही काळाची गरज - श्रीकांत काळे


पिंपळवंडी । प्रतिनिधी

वृक्षारोपण करून वृक्षांचे संवर्धन करणे काळाची गरज असून वनक्षेत्रातच नाही तर जिथे जागा दिसेल तिथे वृक्षारोपण करावे.असे प्रतिपादन पाटोदा वन परिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे यांनी पिंपळवंडी व अंमळनेर येथे केले.ते जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित उपक्रमात बोलत होते.





पिंपळवंडी येथिल पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पिंपळवंडी वनक्षेत्र परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पुढे बोलतांना श्रीकांत काळे म्हणाले की,आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त फक्त वृक्षारोपण करून भागणार नाही, त्या लावलेल्या झाडांचे संवर्धन काळाची गरज आहे.आज वृक्षांची लागवड कमी वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे आहे.साधी उन्हाळ्यात सावलीसाठी आपण झाड शोधतो मग पावसाळ्यात एकतरी झाड लावलेच पाहीले.आम्ही पर्यावरण विभागाच्या वतीने मोफत वृक्षरोपणाची व्यवस्था करू तसेच प्रदूषण नियंत्रणात करण्यासाठी प्रत्येकाने झाडे लावावी व त्यांचे संवर्धन करावे. असे ही आवाहन करण्यात आले.सन २०५० पर्यंत शून्य कार्बन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जगभरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ लवचिकता या अंतर्गत विभागिय वन अधिकारी अमोल गर्कळ यांच्या आदेशानुसार व वन परिक्षेत्राचे अधिकारी श्रीकांत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली,वनपाल ए एम देवगुडे व वनरक्षक एन के काकडे यांनी पिंपळवंडी वनपरिक्षेत्रात येथे ५ जुन रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वनरक्षक एस.आर. राठोड,जी.बी.सानप,डी.टी.यदमल, एस.पी.आघाव,वनमजूर शिवाजी आघाव,ए.ए.सातपुते,सोपान येवले, अंबादास लवांडे,रामेश्वर बेदरे,शेख सत्तार वनसेवक शहादेव पवार,दिलीप शहाणे,सतिष गर्जे,बशिर शेख, दत्ता येवले,श्याम देवकर,सुभाष नागरगोजे,पोपट पवार,पोपट गुजर तसेच पत्रकार बबन उकांडे,भाऊसाहेब पवार,चंद्रकांत पवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उत्कृष्ट नियोजन शहादेव पवार यांनी केले. या वेळी कर्मचारी, अधिकारी, कामगार तसेच ग्रामस्थ आदिंची मोठया प्रमाणात उपस्थित होती.



**राष्ट्रीय महामार्गावर परळी शहरातील वैद्यनाथ महाविद्यालय समोरील अपघातास कारणीभूत ठरत असलेल्या गतीरोधकला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रंग देण्यात आला. सोमवार दि ३ रोजी हे गतिरोधक न दिसल्याने ऑपेरिक्षा पलटी होऊन महिलेला जीव गमवावा लागला होता.**

## विद्यार्थ्यांनी पालकांचा सल्ला घेऊनच करिअर घडवावे : दीपा मुधोळ-मुंडे

### व्यापारी महासंघ आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमात प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी करिअरबाबत निर्णय घेतांना पालकांचा सल्ला घ्यायलाच हवा. त्यांच्या उज्वल भविष्यासाठी पालक योग्य ते मार्गदर्शन करु शकतात असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले.



जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने विशेष प्रावीण्य मिळवून पास होणार्या १० वी तसेच १२ वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रारंभी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम नुकत्याच पार पडलेल्या अतिसंवेदनशील अश्या बीड लोकसभा मतदार संघात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ तसेच बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर ज्यांनी सायबर सेलच्या माध्यमातून नियंत्रण ठेऊन सामाजिक सलोखा व कायदा सुव्यवस्था उत्कृष्ट राखली याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. सर्व व्यापारी,पालक,विद्यार्थी यांनी जोरदार टाळ्या वाजवून प्रशासनाचे अभिनंदन केले. त्यानंतर उपस्थित गुणवंत विद्यार्थी, पालक यांचा स्मृतिचिन्ह, पेन देऊन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते तसेच व्यापारी महासंघ पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी मुधोळ-मुंडे यांनी त्यांचा स्वतः चा दहावी पासून इथ पर्यंतचा प्रवास कसा झाला, विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, पालकांच्या सल्ल्यानेच करिअर निवडावे, काय करायचे याचे ध्येय निश्चित करावे त्यानुसार अभ्यास केला तर तुम्ही यशस्वी होणारच असा विश्वास दिला व बहुमूल्य असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन राजेंद्र मुनोत यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.अक्षता शेटे हिने केले. या कार्यक्रमास मराठवाडा व्यापारी चेंबर चे सचिव श्री.वाय.जनार्दन राव, बीड जिल्हा व्यापारी महासंघ अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोक शेटे, सचिव तुकाराम साळुंके, शहर अध्यक्ष प्रकाश कानगावकर,तालुका अध्यक्ष राजेंद्र बन्सोडे, जवाहरसेठ कांकरिया, सुर्यकांत महाजन, कासट गुरुजी, गंगाबिषन करवा,भारत शेटे,बद्री मानधने,भगीरथ चरखा, सुदाम चव्हाण, अभयसेठ कोटेचा,अमर डागा, दुग्गड मामाजी,सुभाष संचेती, रोटरी अध्यक्ष कृष्णा खांडे,बाळू तिवारी, छाजेड , शाम भंडारी तसेच सर्व व्यापारी प्रतिनिधी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये स्थान मिळावे

**आष्टी । प्रतिनिधी**

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या सुकन्या भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील तिसऱ्या पंतप्रधान पदाच्या कालावधीमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये समावेश करावा अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते लालासाहेब कुमकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रसाद नड्डा गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडे ईमेल द्वारे विनंती केली आहे



### लालासाहेब कुमकर यांची पक्षश्रेष्ठींकडे विनंती

या विनंती पत्रा मध्ये लालासाहेब कुमकर यांनी म्हटले आहे की,

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्रामध्ये कमी संख्येने खासदार निवडून आले आहेत त्यामुळे यापुढे भारतीय जनता महाराष्ट्र राज्यातील जनतेमध्ये प्रभावी रीतीने करता यावा यासाठी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या वारसदार असलेल्या पंकजाताई मुंडे यांनी राज्यातील महायुतीच्या कालावधीमध्ये ग्रामीण विकास विभागामध्ये अत्यंत प्रभावीपणे काम करून आपल्या कामाचा ठसा उमदवलेला आहे मध्यंतरी लोकसभेच्या निवडणुकीमध्ये संयुक्त पुरोगामी आघाडी चे सरकार केंद्रा शासनामध्ये स्थापन होऊन मनमोहन सिंग पंतप्रधान झाले होते त्यावेळी लातूर मतदार संघामध्ये पराभूत होऊन देखील शिवराज पाटील चाकूरकर यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश करून त्यांना केंद्रीय गृहमंत्री पद देण्यात आले होते अशा पद्धतीने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला होता त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या पीछेहाटीवर प्रभावी उपाययोजना म्हणून पुन्हा एकदा महाराष्ट्र मध्ये भारतीय जनता पार्टीच्या कामाचा ठसा उमटवा यासाठी आणि महाराष्ट्र राज्याचा मराठवाड्याचा आणि बीड जिल्ह्याचा विकास पूर्ववत वेगाने व्हावा यासाठी भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचा केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये समावेश करावा असेही विनंती पत्रामध्ये म्हटले आहे.

cmyk

# तणनाशकांच्या किंमतीत वाढ; पीक उत्पादन खर्चावर होणार परिणाम!

पुणे : राज्यात वेळेवर झालेल्या मान्सूनच्या आगमनाने शेतकरी सुखावला असून खरीप हंगामाची जोरदार तयारी सुरू आहे. त्यातच वेगवेगळ्या कृषी निविष्ठांच्या वाढत्या किमतीमुळे या खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. खतांच्या वाढलेल्या किमतीनंतर आता शेतकऱ्यांना तणनाशकाच्या किमतीत झालेली वाढ याचा सुद्धा सामना करावा लागणार आहे.

यंदा भारतीय हवामान विभागाने चांगला पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह आहे. त्यामुळे पीककर्जापासून तर बियाणे, खते आणि औषधे खरेदीपर्यंतच्या तयारीला शेतकरी वेग देत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांमध्ये उत्साह असला तर यंदा अनेक कृषी निविष्ठांचे दर वाढले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा पेरणीचा खर्चही वाढणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी जाणवत आहे. बियाणे, खताप्रमाणेच किटकनाशके आणि तणनाशके या निविष्ठा महत्त्वाच्या आणि आवश्यक मानल्या जातात. मजूर टंचाईमुळे अलीकडच्या




काळात शेतकरी तणनाशकांना पसंती देत आहेत. मात्र यंदा तणनाशकांच्या किमती वाढल्या आहेत. शेतात तण अधिक प्रमाणात वाढल्यास त्याचा थेट परिणाम पिकांच्या वाढीवर होतो. यामुळे सरासरी उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येते. त्यामुळे तणाचा वेळीच बंदोबस्त करणे अत्यावश्यक असते. असे असताना खत, बियाणे, शेती उपयोगी अवजारांचे दर वाढण्यासह तणनाशकाचे दरही वाढविण्यात आल्याने पिकांचे संरक्षण नेमके कसे करायचे, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत. तुरीच्या बियाण्यांचे दरही वधारले खरीप हंगामात सोयाबीन, कपाशी, मूग, उडीद यासोबतच तुरीची विक्रमी क्षेत्रावर लागवड केली जात आहे. यंदा तुरीच्या बियाण्यांचे दर चांगलेच वधारले असून शेतकऱ्यांना जाणवणाऱ्या आर्थिक अडचणीत अधिकच भर पडली आहे. वाढत्या महागाईमुळे शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील आर्थिक बजेट विस्कळीत झाल्याचे बोलले जात आहे.

### तणनाशकांचे आधीचे आणि आताचे दर (प्रति लिटर)

ग्लायसिल : ३५० - ४५०
परसूट : ११०० - १३५०
सरगा सुपर : १३५० - १४००
साकेत : ८०० - ८५

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२४ : पेरू येथे भूकंप.
१६५८ : मुघल शासक औरंगजेब यांनी आग्र्याचा किल्ला काबीज केला
१६७० : पुरंदरच्या तहात गमावलेला रोहिडा किल्ला शिवाजी महाराजांनी परत जिंकून घेतला.
१७०७ : औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुअज्जम आणि आझमशाह या त्याच्या दोन मुलांमधे दिल्लीच्या तख्तासाठी युद्ध झाले. यात मुअज्जमने आझमशाहला ठार करुन दिल्लीची गादी बळकावली.
१७१३ : मुघलांनी १६८९ मधे जिंकलेला रायगड किल्ला पंतप्रतिनिधी यांनी सिद्दीकडुन राजकारणाने जिंकुन घेतला.
१७८३ : आईसलँड मधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक, हजार ठार.
१९१२ : कार्ल लेम्ले यांनी यूनिव्हर्सल पिक्चर्स या कंपनीची स्थापना केली.
१९१५ : टिळकांनी मंडाले तुरुंगात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून पुर्ण केला.
१९१५ : लो. टिळक यांचे मंडालेच्या तुरुंगातून सुटका.
१९१८ : नोव्हा ॲक्विला या सर्वाधिक तेजस्वी तेजोमेघाचा शोध.
१९४१ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी सीरीया व लेबानॉन पादाक्रांत केले.
१९४८ : भारत व इंग्लंड यांच्या दरम्यान एअर-इंडियाची हवाई सेवा सुरु.
१९४८ : जॉर्ज ऑर्वेलची १९८४ या नावाची कांदबरी प्रसिद्ध झाली.
१९५३ : कृष्णवर्णीयांना हॉटेलमधे सेवा नाकारण्यास अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली.
१९६८ : बर्मोडा देशाने संविधान अंगिकारले.
१९६९ : लष्करप्रमुख म्हणून सॅम माणेकशा यांची नियुक्ती.
१९९२ : पहिल्यांदा जागतिक महासागर दिन साजरा केला गेला.
२००४ : आधुनिक काळातील शुक्राचे (सूर्यावरुन) पहिले अधिक्रमण झाले. याआधीचे अधिक्रमण १८८२ या वर्षी झाले होते.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०६ : भारतीय क्रिकेट खेळाडू सैयद नझीर अली यांचा जन्म.
१९१० : दिनकर केशव बेडेकर, तत्त्वचिंतक, समीक्षक, लेखक (मृत्यू: २ मे १९७३)
१९१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट २०१५)
१९१७ : गजाननराव वाटवे, भावगीत गायक आणि संगीतकार. (मृत्यू: २ एप्रिल २००९)
१९२१ : इंडोनेशिया देशाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष सुहार्तो यांचा जन्मदिन.
१९२५ : बार्बरा बुश, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुशची पत्नी व जॉर्ज डब्ल्यु. बुशची आई.
१९३२ : सैयद नझीर अली, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भैतिकशास्त्रज्ञ केनिथ गेडीज विल्सन यांचा जन्म.
१९५५ : वर्ल्ड वाईड वेब चे जनक टिम बर्नर्स-ली यांचा जन्म.
१९५७ : चित्रपट अभिनेत्री डिंपल कपाडिया यांचा जन्म.
१९७५ : शिल्पा शेट्टी, भारतीय अभिनेत्री आणि निर्माता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३२ : इस्लाम धर्माचे संस्थापक मोहंमद पैगंबर यांचे निधन.
१७९५ : फ्रान्सचा राजा लुई १७ वा यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १७८५)
१८०९ : अमेरिकन विचारवंत राजकारणी थॉमस पेन यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १७३७)
१८४५ : अमेरिकेचे वे७ राष्ट्राध्यक्ष ॲन्ड्रयू जॅक्सन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १७६७)
१९९५ : रंगभूमी कलावंत एकपात्री प्रयोगकार राम नगरकर यांचे निधन.
१९९८ : नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष सानी अबाचा यांचे निधन.
२००९ : लोकप्रिय भारतीय उर्दू-हिंदी नाटककार, चित्रपट दिग्दर्शक, कवी आणि अभिनेता हबीब तनवीर यांचे निधन.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा!



पुणे : कित्येक दिवस कमी कांदा दरामुळे नाराज झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. सध्या अनेक बाजारपेठेत कांद्याच्या दरात चांगली वाढ झाली आहे. काही ठिकाणी तर कांद्याला ३० रुपये प्रति किलोपर्यंत भाव मिळाला आहे.

कांद्याचे दर वाढण्याचे वेगवेगळी कारणे असली तरी यावर सर्वात मोठा प्रभाव हा लोकसभा निवडणुकीच्या निकालाचा असल्याचे बोलले जात आहे. कांदा उत्पादक पट्ट्यातील मतदारांनी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मतपेटीतून सरकारविरोधी मतदान केले. याचा परिणाम म्हणून काही ठिकाणी कांद्याच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे. दुसरे कारण म्हणजे बाजारात कांद्याची आवक कमी झाल्याने दरात वाढ झाली आहे. कांद्याची निर्यात वाढल्याने आणि स्थानिक बाजारपेठेतील पुरवठा कमी झाल्याने कांद्याचे भाव वाढले आहेत. कांद्याच्या दरात वाढ होण्याचे विविध कारणे असली तरी यामुळे कांदा उत्पादक शेतकरी सुखावला असेल हे नक्की. उशिरा का होईना शेतकऱ्यांच्या कांद्यास चांगले दर मिळत आहेत.

### वेगवेगळ्या बाजार पेठेतील कांद्याचे दर

सोलापूर : ३३ रुपये प्रति किलो, पुणे : १६०० ते २००० रुपये प्रति क्विंटल, इस्लामपूर : १५०० ते ३००० रुपये प्रति क्विंटल, चंद्रपूर : १३०० ते २५०० रुपये प्रति क्विंटल, सातारा : २००० ते २५०० रुपये प्रति क्विंटल.

# उन्हाळी मिरची बाजारात दाखल; जाणून घ्या तेजा फोर हिरवी मिरचीचा भाव!

सध्या बाजारात उन्हाळी मिरचीची आवक सुरू झालेली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात पाणीटंचाई असताना देखील शेतकऱ्यांनी यावर्षी उन्हाळी मिरचीची मोठ्या प्रमाणावर लागवड केलेली होती. आता ही मिरची बाजारात येऊ लागली असून, आमठाणा बाजारात मिरची खरेदीला गुरूवारी सुरुवात झाली. यामध्ये 'तेजा ४' मिरचीला सर्वाधिक साडेदहा हजार रुपये प्रति क्विंटलचा भाव मिळाल्याने उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सिल्लोड तालुक्यातील आमठाणा, देऊळगाव बाजार, घाटनांद्रा, धावडा, केळगाव, कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी, करंजखेडा या भागात एप्रिल महिन्यात उन्हाळी मिरचीची यंदा सर्वाधिक लागवड झालेली आहे. आता ही मिरची बाजारात येण्यास सुरुवात झाली आहे. परिसरात आमठाणा येथे मिरचीची मोठी बाजारपेठ असून येथून आखाती देशात 'तेजा फोर' मिरची पाठविली जाते. गुरूवारी या मिरची मार्केटला सुरुवात झाली. यानंतर मिरची खरेदी सुरू करण्यात आली. यात 'तेजा फोर' वाणाच्या मिरचीला सर्वाधिक १० हजार ५०० रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला.

शेतकरी समाधानी

आमठाणा येथील बाजारात मिरचीला मागील वर्षी प्रति क्विंटल ११ हजार रुपये भाव मिळाला होता. या वर्षीही १० हजार ५०० रूपयांचा दर पहिल्याच दिवशी मिळाल्याने शेतकर्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. आणखी भाव वाढावा किंवा आहे, तोच टिकून राहावा, अशी उत्पादक शेतकर्यांची इच्छा आहे.




# पावसाळ्यात पशुंना होणारे वेगवेगळे आजार व समस्या

पावसाळ्यात जनावरे अनेक संसर्गजन्य आजाराला बळी पडतात. हे टाळण्यासाठी या काळात जनावरांची योग्य काळजी घ्यावी लागते. जाणून घेऊ या पावसाळ्यात जनावरांमध्ये आढळणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय.

पोट फुगणे : हिरवा व कोवळा चारा जास्त प्रमाणात खाल्याने जनावरांना हा त्रास होतो. यामुळे पोटात गॅस तयार होतो. पोटाकडची डावी बाजू फुग्यासारखी दिसते. फुगलेल्या पोटाचे वजन हृदयावर व फुफ्फुसावर पडल्याने जनावर दगावण्याची शक्यता असते.

उपाय : पोटफुगी टाळण्याकरिता जनावरांना हिरव्या चाऱ्याबरोबर दोन ते तीन किलो सुका चारा खायला द्यावा. जनावरांना दिवसभर चरायला सोडू नये. कारण जनावर दिवसभर कोवळे गवत खाते. पावसाळ्यात पशु वैद्यकाच्या सल्ल्यानुसार पोटफुगीवर औषधे आणून ठेवावीत. जेणेकरून जनावरावर वेळीच उपचार करता येतील. पोटफुगी आजारावर प्रथमोपचार म्हणून अर्धा लिटर गोडे तेलात ३० मि.लि. टर्पेंटाईन, १०० ग्रॅम सोडा व ५ ग्रॅम हिंग मिसळून आजारी जनावराला ठसका न लागता हळूहळू पाजावे.

खुरातील जखमा : पावसाळ्यात जनावरांचे पाय सतत पाण्यात राहिल्यामुळे किंवा त्यात चिखल गेल्यामुळे खुरांमध्ये जखमा होतात. सतत ओलावा राहिल्यामुळे अशा जखमा चिघळून त्यावर माशा बसतात आणि जखमेत किडे पडतात. असे झाल्याने जनावरांच्या पायांना वेदना होतात, जनावर लंगडते. परिणामी जनावरांचे चारा खाण्याचे प्रमाण कमी होते व दुग्धोत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम



होतो. शेळ्या-मेंढ्यामध्ये अशा जखमा झाल्यास त्यांना धनुर्वात होतो. उपाय - जनावरांचा गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा. जखम पोटॅशिअम परमॅगनेटने स्वच्छ करून मलमपट्टी करावी.

पावसाळ्यातील संसर्गजन्य आजार : पावसाळ्यात जनावरांना घटसर्प, फऱ्या, पायलाग यासारखे संसर्गजन्य आजार होतात. दमट वातावरणात घटसर्पासारखे श्वसनाचे आजार जास्त प्रमाणात दिसून येतात. या आजारात जनावरांच्या छातीत पाणी होते, खालच्या जबड्याखाली सूज येते, श्वासोच्छवास करायला त्रास होतो, जनावरास १०४ ते १०५ अंश फॅरेनहाईट ताप येतो. संसर्ग झालेल्या जनावरांपैकी ९० टक्के जनावरे मृत्युमुखी पडतात.

उपाय - पावसाळ्याच्या सुरवातीला किंवा उन्हाळ्यात मे-जून महिन्यात जनावरांना या आजारावर प्रतिबंधात्मक लस टोचावी. त्याप्रमाणे फऱ्या, पायलाग, काळरोग, धनुर्वात याही आजारावर लसीकरण करून घ्यावे. गढूळ पाण्यामुळे होणारे आजार: पावसाळ्यात पाणी गढूळ होण्याची शक्यता अधिक असते. गढूळ पाण्यामुळे रोगजंतूंचा प्रादुर्भाव वाढतो.

बुळकांडी: या आजारामुळे जनावरांना दुर्गंधी युक्त जुलाब होते, जिभेवर, आतड्यांवर तसेच त्वचेवर बारीक पुटकुळ्यांसारखे फोड येतात. ताप येऊन डोळ्यांतून व नाकातून पाणी वाहते. डोळे लालसर होतात. शरीरातील पाणी कमी होऊन जनावरांना तीव्र अशक्तपणा येतो व ४ ते ८ दिवसांत जनावर दगावते.

अतिसार (हगवण): पावसाळ्यात बऱ्याचदा जनावरांना गढूळ पाणी प्यावे लागते, त्यामुळे या आजाराचा संसर्ग होऊन जनावरे अतिसारास बळी पडतात.

उपाय - प्रतिबंधात्मक उपचारामध्ये जनावरांची वैयक्तिक, तसेच गोठ्याची स्वच्छता राखणे, तसेच जनावरांना स्वच्छ पाणी पाजावे. निरोगी जनावरांना आजारी जनावरांपासून दूर ठेवावे. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने औषधोपचार करावेत.

सर्दी पडसे : वातावरणातील बदल, अति थंडी किंवा पावसात भिजल्याने जनावरांमध्ये हा आजार दिसून येतो. नाकातून सारखे पाणी वाहणे, ताप येणे, तसेच शिंका येऊन नाकातून चिकट द्रव बाहेर पडतो व त्यामुळे नाकातील भाग लालसर होतो. काही प्रमाणात तापही दिसून येतो.

उपाय - प्रतिबंधात्मक उपचारामध्ये पावसाळ्यात कृत्रिम ऊब उपलब्ध करून देण्यासाठी गोणपाटाचा वापर करावा. गोठा स्वच्छ, कोरडा ठेवावा. जनावरांचे नाक, पोटॅशच्या पाण्याने स्वच्छ धुवावे. पशु वैद्यकाच्या सल्ल्याने प्रतिजैविकाची मात्रा द्यावी.

# आता घरी बसूनच करा जनावरांची गर्भधारणा चाचणी!



पशुपालकांनो आता तुम्ही तुमच्या जनावरांची गर्भधारणा घरीच तपासू शकता! हो तुम्ही जे वाचलेत ते अगदी खरं आहे. भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाने विकसित केलेले ''प्रेगा-डी'' नावाचे हे किट जनावरांच्या लघवीच्या दोन थेंबांमधून गर्भधारणा निश्चित करते.

नियामतपूर येथील कृषी विज्ञान केंद्र, पशु संवर्धन विभागाचे तज्ज्ञ डॉ. शिवकुमार यादव यांनी या किटबद्दल माहिती दिली. ते म्हणाले, ''हे किट वापरणे सोपे आहे आणि परिणाम त्वरित दिसून येतो. यामुळे पशु पालकांना वेळीच योग्य निर्णय घेता येतील आणि त्यांच्या जनावरांची चांगली काळजी घेता येईल.किटचा वापर कसा करायचा?

प्रेगा-डी किट जनावरांची औषधे विकणाऱ्या मेडिकल स्टोअरमधून किंवा डॉक्टरांकडून १० रूपयांना खरेदी करा. गाय किंवा म्हशीच्या मुत्राचे दोन थेंब किट मधील चाचणी ट्यूबमध्ये टाका. काही सेकंदात, डिस्प्लेवर रंग बदल होईल. गडद लाल किंवा जांभळा रंग: प्राणी गरोदर आहे. पिवळा किंवा हलका रंग: प्राणी गर्भवती नाही. गर्भधारणा तपासणी किटचे फायदे : वेळेची बचत होऊन आणि खर्च कमी होईल. अचूक परिणाम मिळते. पशुपालकांना जनावरे गर्भार आहेत हे कळल्यावर त्यांची चांगली काळजी घेता येईल. गर्भाचा चांगला विकास होईल. निरोगी जनावरे आणि चांगले दूध उत्पादन मिळेल.

# पवनचक्की कोसळण्याच्या घटनेनंतर महाजनवाडीकर दहशतीखाली

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराला वैतागलेले महाजनवाडीकर काल गुरूवार रोजी गेवराई तालुक्यातील गोविंदवाडी शिवारातील पालख्या डोंगराजवळील टेंभी ताडा येथील पवनचक्की कोसळल्याने दहशतीखाली असुन महाजनवाडी येथील पवनचक्की प्रकल्पाच्या अपघात प्रवण क्षेत्रात असलेल्या ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व न्यायालयात दाद मागितल्यानंतर अखेर रस्त्यावर उतरून लढाई करण्याचे ठरवले असुन लवकरच रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.

महाजनवाडी शिवारात गट नंबर ४९६,४९७,४२१व ५०१ मध्ये वडिलोपार्जित समाईक असलेली जमीन कुटुंबातील ६ व्यक्तींच्या नावावर असुन या समाईक क्षेत्राचे महसूल अभिलेखात ७/१२ पत्रकावर शेतजमिनीचे आपसांत तंतोतंत आजतागायत वाटप झालेले नाही.पवन उर्जा कंपनीने जमिनीच्या ६ मालकांपैकी केवळ दोघांच्या संमतीने सहा एकर जमिन १८ वर्षे ११महिन्यांसाठी भाडे तत्वावर दुय्यम निबंधक जिल्हा कार्यालय बीड येथे नोंदणी करून घेतली आहे.

ईतर ४ जमिन मालकांना याची कल्पनाही नाही.संबधित प्रकरणात जिल्हा बीड आणि न्यायालयात दावा दाखल केला असुन कंपनीला नोटीस पाठवली आहे.नियमा नुसार २३० मिटर अंतरामध्ये कच्चे अथवा पक्के घर म्हणजे रहिवास नसावा ही अट असताना १०० मिटरवर लोकवस्ती आहे.विशेष म्हणजे पवनचक्की प्रकल्पाची जागा अगोदर मोजणी करताना दुसरीच होती.मात्र नंतर लोकवस्ती मध्ये प्रकल्प उभारण्यात आला आहे.



## कंपन्यांच्या कारभार विरोधात रास्ता रोको-डॉ. ढवळे

बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून अज्ञानी शेतकऱ्यांची दिशाभूल आणि आर्थिक लुबाडणूक होत असून जिल्हा प्रशासनाला लेखी तक्रारी नंतर सुध्दा शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी महसूल आणि पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत पुढा-यांच्या सांगण्यावरून पिडीत शेतकऱ्यांना धमकावण्याचे प्रकार घडत असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात लवकरच मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावर महाजनवाडी फाट्यावर रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.

घटनेनंतर जास्त भिती वाटते-शारदा घरत

पवनचक्की पासुन आमचं राहतं पक्कं सिमेटचं घर आणि कोठा १०० मीटर अंतरावर असुन काल गेवराई येथील पवनचक्की कोसळल्यानंतर आम्हाला आमच्या व जनावरांच्या जिवाची जास्त भिती वाटु लागली असुन हा प्रकल्प दुसरीकडे हलवावा.अशी मागणी शारदा घरत यांनी केली आहे.

# रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी कल्याण काळे तर सचिवपदी धनराज सोळंकी

## रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची नविन कार्यकारिणी जाहिर

अंबाजोगाई -:प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षपदी कल्याण काळे यांची तर सचिवपदी धनराज सोळंकी यांची सन २०२४-२०२५ या नविन वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ही संस्था गेल्या अनेक वर्षापासुन अंबाजोगाई शहर व परिसरात सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले. उपेक्षीत व वंचितासाठी रोटरी क्लबचे विविध प्रकल्प सातत्याने कार्यरत असतात. याही वर्षी रोटरी क्लबची सन २०२४-२०२५ या कालावधीसाठी नविन कार्यकारीणी जाहिर करण्यात आली आहे. यात अध्यक्ष-कल्याण काळे, उपाध्यक्ष-अजित देशमुख, सचिव- धनराज सोळंकी, सहकोषाध्यक्ष - महेश सारडा, कोषाध्यक्ष सचिन बेंबडे तर कार्यकारीणी सदस्य म्हणून माजी अध्यक्ष स्वप्नील परदेशी सल्लागार म्हणून प्रा.संतोष मोहिते तर कार्यकारीणी सदस्य म्हणून डॉ.अनिल केंद्रे, प्रदिप झरकर, मोईन शेख, बालासाहेब कदम, डॉ.नवनाथ घुगे, गोपाळ पारीख, ओमकेश दहिफळे, मंजूषा जोशी, सुनंदा मुंदडा, गणेश राक्षत, डॉ.निशिकांत पाचेगाकवर, ॲड.अनिल लोमटे, शेख शकील, स्वरूपा



कुलकर्णी, बालाप्रसाद चोकडा, डॉ.सुरेश आरसुडे, राजेंद्र घोडके, प्रा.रमेश सोनवळकर, पुरूषोत्तम रांदड, बालासाहेब लोमटे, सुरेश मोदी, प्रा.रोहिण पाठक यांची निवड करण्यात आली आहे. रोटरी क्लबच्या माध्यमातून आगामी काळात सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वंचितांसाठी, दिव्यांगासाठी व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार असल्याची रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे व सचिव धनराज सोळंकी यांनी सांगितले. रोटरी क्लबच्या या नुतन पदाधिकार्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# चढ्या भावाने बी -बियाणे विक्री करणाऱ्यावर कारवाई करा-भाई प्रभाळे

बीड । प्रतिनिधी

७ जुन अगोदरच दुष्काळाच्या फटक्याने उध्वस्त झालेला शेतकरी खरीप हंगामाची पेरणीची तयारी करीत असताना कापुस,सोयाबीन या पिकाला प्राधान्य देत आहे परंतु महाबीज बियाणांचे व्यापाऱ्यांनी कृत्रिम तुटवडा निर्माण केला आहे.तुलसी कंपनीची कब्बडी, ॲग्रो सिड्स कंपनीचे ७०६७ बियांणाची विक्री ८६४ रुपये किंमतीची बॅग ब्लक ने १२५० ते १३५० पेक्षा जास्त दराने बियाणे विक्री करून शेतकऱ्याची लूट सुरू केली जात आहे.सोयाबीन २२०० रु किंमतीची बॅग ३००० रु पर्यंत काळ्या बाजारात विक्री होत असताना. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे साहेब यांनी विशेष लक्ष वेधून जिल्हा प्रशासनास सुचना देऊन कृषी



दुकानदारांचे स्टिंग ऑपरेशन करून ही लूट थांबवावी अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे प्रा. दत्ताभाई प्रभाळे यांनी केली आहे.

महागाई त्रस्त झालेल्या शेतकऱ्याला आस्मानी व सुलतानी या दोन्ही संकटाचा सामना करावा लागत आहे. मागील खरीप हंगामात बियाणे पेरले ते उगवलेच नाही, शासनाकडे तक्रार केली तर नुसते पंचनामे करून मोकळे होतात मात्र सरकार शेतकऱ्यांचे आर्थिक मदत मिळून देण्याकरिता दुर्लक्ष करते, या वर्षी वेळेवर पाऊस पडण्याची स्थिती निर्माण झाली परंतु कापुस बॅग, सोयाबीन बी- बियांणाचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे, तात्काळ शेतकऱ्यांची लूट थांबवावी अशी मागणी शेतकरीवर्ग करत असताना जिल्हा प्रशासनास झोपेचे सोंग घेवून कृषी दुकानदारांची पाठराखण करताना दिसत आहेत. शेतकरन्यानी बी बियाणे खरेदीच्या पावत्या व गोण्या जपून ठेवाव्यात, याही वर्षी उगवण झाली नाहीतर सीड कंपन्याला जाब विचारावा लागेल ,संघटित होऊन शेतकऱ्यांनी स्वतः ही लुट होऊ देऊ नये असे युवक काँग्रेस जिल्हा सरचिटणीस प्रा. दत्ताभाई प्रभाळे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे.

# चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या हरिपाठ प्रवचनमालेचा रविवारपासून प्रारंभ

## भाविकभक्तांनी लाभ घ्यावा - आयोजन समीतीने आवाहन

बीड । प्रतिनिधी

हरीच्या दासा हरी दाही दिशा ! भावे जैसा तैसा हर एक !! श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान बीड व श्रीमद्? जनीजनार्दन पाटंगण संस्थान, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वै. वे.शा.स. धुंडीराजशास्त्री पाटंगणकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या अमृतवाणीतून रविवार दि.१० जुन २०२४ पासून तीन दिवशीय प्रवचनमाला आनंद, भक्तीमय वातावरणात संपन्न होत असून श्री संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ याविषयावर होत असलेल्या प्रवचनमालेचा प्रारंभ ज्येष्ठ शु. ४ सोमवार दि.१० जुन ते जेष्ठ शु.६ शके १९४६ बुधवार दि.१२ जुन २०२४ दरम्यान सायं. ०६.०० ते ०८.०० यावेळेत संस्थान थोरले पाटंगण, जुन्या तहसिल मागे, बीड येथे संपन्न होत आहे.

पाटंगण संस्थान हे शहराचे अध्यात्मिक शक्ती केंद्र असून श्रीमद्जनीजनार्दन थोरले पाटंगण संस्थानच्या वतीने वर्षभर विविध अध्यात्मिक, , सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन सातत्याने होत असते त्याचाच एक भाग म्हणून मागील वर्षी श्रीमद्? भगवद्गीता वय वर्षे ०८ ते १८ आणि १८ वर्ष ते पुढील वयोगटातील स्पर्धकांसाठी श्रीमद्? भगवद्गीता पाठांतर स्पर्धा परीक्षा संपन्न झाली तर वै.दादांच्या चतुरंग कार्याचा उजाळा म्हणून विद्वमणी पुरस्कार प्रदान सोहळयात पुरस्कारार्थी प्रो.पराग जोशी (कवी कालिदास युनिव्हर्सिटी, नागपूर) यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला तसेच विद्यावाचस्पती डॉ.दिनेश रसाळ यांचे विशेष व्याख्यान संपन्न झाले.

परमपूज्य श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या अमृतवाणीतून संपन्न होत असलेल्या संत एकनाथांचा हरिपाठ या विषयावरील तीन दिवशीय प्रवचनमालेस आपण महिला, पुरुष भावीकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्नवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान बीड व श्रीमद्? जनी जनार्दन संस्थान थोरले पाटंगण, जुन्या तहसीलच्या मागे बीड यांच्या वतीने करण्यात आले असून प्रवचनमालेस येणाऱ्या वाहनांची व्यवस्था किल्ला मैदान परिसर, बलभीम चौक, बीड येथे करण्यात आले असल्याचे आयोजन समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये: ॲड.सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत जाती- पातीच्या प्रचारामुळे लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना पराभव स्विकारावा लागला. अतिशय अल्प मतांनी झालेला हा पराभव अंतीम नाही. स्व. लोकनेते स्व. मुंडे साहेबांची लेक असलेल्या पंकजाताई संघर्षकन्या असून त्या फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा भरारी घेणार आहेत. यामुळे कार्यकर्त्यांनी खचून न जाता विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीच्या तयारीला लागावे, असे आवाहन भाजपा नेते ॲड. सर्जेराव तांदळे यांनी केले आहे.

पुढे बोलताना ॲड. सर्जेराव तांदळे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जिवाचे रान केले. प्रत्येक कार्यकर्ता आणि समर्थक पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्यासाठी परिश्रम घेत होता. परंतू निवडणुकीत किळस यावी एवढा जातीयवाद बीड जिल्ह्यात झाला. काही लोकांनी सुपारी घेतल्याप्रमाणे विरोधात काम केले. असे असतानाही पंकजाताई मुंडे यांनी ६ लाख ७७ हजार मते घेतली. अपघ्या साडेसहा हजार मतांनी पंकजाताई यांना पराभव स्विकारावा लागला. या पराभवामुळे कार्यकर्त्यांत निराशा आली आहे. परंतू कार्यकर्त्यांनी निराश होऊ नये. पंकजाताई मुंडे हे फार मोठे नेतृत्व आहे. राजकारणात जय- पराजय होत असतो.

# भराटवाडी येथील पवन थोरवे याचे नीट परीक्षेत उज्वल यश

## ७२० पैकी ६७५ गुण मिळवत घेतली झेप

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी पवन ज्ञानदेव थोरवे यांनी नीट परीक्षेत उज्वल यश संपादन करून या विद्यार्थ्याने ७२० पैकी ६७५ गुण मिळवून वैद्यकीय प्रवेश निश्चित केला आहे.या घवघवीत यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पाटोदा तालुक्यातील भराटवाडी येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील ज्ञानदेव सिताराम थोरवे यांचा चि.पवन थोरवे हा मुलगा असून त्याने जिद्द व चिकाटीने अभ्यास करून भराटवाडी सारख्या खेडेगावचे नाव उज्वल केले आहे.तसेच त्याला बारावीला ८१.३३ मार्क मिळालेले आहेत.त्याचे ०१ ली ते ०४ थी पर्यंतचे शिक्षण भराटवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत झालेले आहे तसेच पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण बीड येथील भगवान विद्यालयात होऊन त्याला दहावीला ९८ टक्के मार्क मिळाले होते.त्याने नीट साठी बीड येथील उमाकिरण क्लासेसला ॲडमिशन घेतले



होते.तो पहिल्याच प्रयत्नात नीट परीक्षा उत्तीर्ण होऊन त्याने केमिस्ट्री विषयात १८० पैकी १८० गुण प्राप्त केलेले आहेत. त्याच्या घवघवीत यशाबद्दल श्री. गंगाभारती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती गुरुवर्य महंत महादेवानंद भारती महाराज मुख्याध्यापक ए.एम. पवार सर तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच भराटवाडीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून अभिनंदन केले जात आहे.

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये जागतिक पर्यावरण दिन साजरा

परळी । प्रतिनिधी

दिल्ली वल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ येथील विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा केला, यंदाही शाळेच्या परिसरात अनेक वृक्षांची लागवड केली. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवडी बरोबरच आकर्षक प्रार्थना सादर करत जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व पटवून दिले. सदर प्रसंगी प्रशालेच्या प्राचार्य श्रीकांत पाटील तसेच शिक्षकांनी देखील वृक्षारोपणात सहभाग घेत सर्वांनी वृक्षरोपणाची गरज व त्याचे फायदे व वृक्षसंवर्धन कसे करावे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सदर प्रसंगी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा ऊषा किरण गित्ते



तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. किरण गित्ते साहेब (सचिव नगरविकास सार्वजनिक बांधकाम उद्योग पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) त्याचबरोबर प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीकांत पाटील यांनी केले.

# आला जून चा महिना, झाडे लावा-झाडे जगवा!

बीड । प्रतिनिधी

नुकताच जगभरात ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने पुन्हा एकदा नेहमीप्रमाणे झाडे लावा-झाडे जगवा हा संदेश देण्यात आला. हा संदेश फक्त म्हणून, लिहून किंवा वाचून उपयोग नाही तर प्रत्यक्षात झाडे लावण्याची कृती करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. काल ६ जून रोजी बीडहून औरंगाबादला जावून आज दिनांक ७ जून रोजी परत आलो असता प्रवासात जाता-येताना रस्त्याच्या दोन्ही बाजूने संपूर्ण सव्वाशे किलोमीटर पर्यंत नजर मारली असता काय दिसले तर रखरख रान आणि रस्त्याच्या दुतर्फा रूक्ष साईड पंखे. हे पाहून मन भूतकाळात गेले. जेव्हा शालेय शिक्षण घेत असताना दिवाळीच्या किंवा उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्यावर आजोळी दौलताबादला जायचो. तेव्हा काय दिसायचे तर रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठी लिंबाची, वडांची, उंबर, बाभूळ, चिंच, आंबे यासारखी मोठ मोठी आणि शुद्ध भारतीय झाडे. रानावनात सुद्धा या झाडांची कमतरता नव्हती. बसच्या खिडकीतून बाहेर पाहिल्यावर



पाहतच राहावे असे वाटायचे. अशी हिरवीगार व मोठमोठी झाडे पाहता पाहता मान सुद्धा आकडायची पण मनाला अपरिमित आनंद व्हायचा. मात्र आज जी अवस्था दिसते ती पाहू वाटत नाही. एवढी भीषण अवस्था झाली आहे.

गेल्या काही वर्षात आपणच मोठ्या प्रमाणात झाडांच्या कत्तली केल्या. यामुळे आज सगळीकडे कसं रखरख आणि रुक्ष दिसून येतं. झाडे कमी झाल्याने माणसांसह जनावरांना मिळणारी नैसर्गिक सावली नष्ट झाली. शुद्ध ऑक्सिजनची मिळणारी हवा कमी झाली. शिवाय झाडांमुळे पावसाळ्यात पडणारे पाणी जे झाडांद्वारे, झाडांच्या मुळांद्वारे जमिनीत मोठ्या प्रमाणात झिरपत जायचे आज मात्र आवश्यक संख्येत झाडेच राहिली नसल्याने ही क्रिया आता होत नाही. म्हणूनच एकेकाळी जमिनीत विहीर घेताना जिथे २५ ते ३० फूट खांदल्यानंतर पाणी लागायचे, तिथे आता ३०० ते ५०० फूट खोल बोअर मारावे लागत आहे. यावरून हे लक्षात येते की, आपणच आपल्या हातून आपला विध्वंस करू लागलो आहोत. जेव्हा लोकसंख्या कमी होती, तेव्हा झाडे भरपूर होती. आज कोणत्याही रस्त्यांवरून जाताना रस्त्याच्या दुतर्फा काय दिसून येते तर रूक्ष झालेली राने-वने, रस्त्याचे दोन्ही कडील साईड पंखे. हीच अवस्था यापुढेही राहिली तर आपला सुजलाम सुफलाम असलेला भारत देश पुढील काही काळात वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपल्या देशात लोकसंख्येच्या मानाने एवढी तेवढी नाही तर चक्क ५०० कोटी झाडे कमी आहेत. आता जून महिन्याचा एक आठवडा उलटून गेला आहे. दरवर्षीप्रमाणे यावेळी ही ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला आहे. आता ७ जून पासून पावसाळ्याचा हंगाम सुरू होणार आहे. तेव्हा पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचा झाडे लावण्यासाठी उपयोग करून घेता येईल. आपण राहतो तिथेही आणि रस्त्याच्या कडेलाही शक्य होईल तिथे या पावसाळ्याच्या हंगामात झाडे लावण्यास सुरुवात करा. झाडे लावताना हे लक्षात ठेवा की, चांगली मजबूत व भारतीय झाडेच लावा. लावलेली झाडे पावसाळ्याच्या चार महिन्यात तगली तर ती हमखास मोठी होतात आणि त्याचा लाभ माणसांसोबतच पशु-पक्ष्यांनाही होतो. तेव्हा नागरिकांनो, शासन-प्रशासनाकडून आलेले झाडे लावा-झाडे जगवा हे ब्रीद फक्त बोलून, सांगून, ऐकून, वाचून किंवा लिहून उपयोग नाही तर यासाठी झाडे लावण्याची खरी गरज आहे. लावलेली झाडे निगा राखून मोठी करण्यासाठी मेहनत घेणे आवश्यकच नाही तर अत्यंत आवश्यक आहे, हे लक्षात घ्या.

## झाडे जगवणारी वाडा संस्कृती नष्ट

काही काळापूर्वी गरीबातील गरीबाचे घर दगड मातीचे जरी असले तरी एक वेळ त्याच्या घरात खोल्या छोट्या छोट्या असायच्या परंतु अंगण मोठे असायचे आणि त्या अंगणात किमान एक दोन झाडे तरी लावलेली असायची. तीही शुद्ध भारतीय झाडे, परंतु कालौघात आता वाडा संस्कृती मोडीत निघाली, नष्ट झाली आहे. त्याची जागा पक्क्या घरांनी घेतली. यामुळे अंगण विरहित घरांचे बांधकाम होऊ लागले. अंगणच नसल्याने साहजिकच झाडे लावण्याकडे ही कोणाचा कल राहिला नाही. कमीत कमी जागेत जास्तीत जास्त खोल्या कशा निर्माण करता येईल याकडे माणसाचा दृष्टिकोन वाढला आहे. वाडे नष्ट झाले, अंगण नष्ट झाले, झाडेही नष्ट झाली आहेत.

## बिल्डरांना बंधने घालावीत-युसूफ़

आजकाल कमी जागेत जास्तीत जास्त बांधकाम व खोल्या कशा काढता येतील, याकडे सर्वसामान्यांसह बिल्डरांचाही कल वाढला आहे. यामुळे दिवसेंदिवस झाडांचा नायनाट होत चालला आहे. ही परिस्थिती अत्यंत विदारक स्थितीत गेली आहे. म्हणून आता शासन-प्रशासनाने कडक पावले उचलण्याची गरज आहे. ज्या-ज्या इमारती बांधून तिथे लोक राहत आहेत अशा इमारतींच्या चारही बाजूने झाडे लावण्याची सक्ती करण्यात यावी. तसेच नवीन इमारतींना परवानगी देण्याअगोदर इमारतीच्या चारही बाजूंनी मजबूत भारतीय झाडे लावण्याची सक्त

# वादग्रस्त पोस्ट करणारे अन् ॲडमिनवरही होणार कारवाई-पोलीस अधिक्षक ठाकूर

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक मतमोजणी निकालानंतर सोशल मीडियावर वादावादी सुरू झाली आहे. वादग्रस्त पोस्ट केल्याने दोन समाजांत, गटांत हाणामाऱ्या, दगडफेक अशा घटना घडत आहेत. याच अनुषंगाने पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेत शांतता ठेवण्याचे आवाहन केले. सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट करणाऱ्यांवर तर कारवाई होणारच आहे, शिवाय त्याखाली कमेंट्स करणारे आणि ग्रुप डमिनवरही कडक कारवाई करण्याचा इशारा ठाकूर यांनी दिला आहे.

जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत यावेळी जातीय राजकारण झाले. मतमोजणीनंतर याचे पडसाद जिल्ह्यात अनेक ठिकाणी उमटले. त्यानंतर पोलिसांनी शांतता समितीची बैठक घेत आवाहन केले. त्यामुळे काही दिवस शांतता राहिली. परंतु आता पुन्हा एकदा मतमोजणीनंतर सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट केल्याने तणाव निर्माण होत आहे.



यासंदर्भात सायबर पोलिसांनी नजर ठेवून वादग्रस्त पोस्ट हटवल्या, शिवाय कारवायाही केल्या आहेत. परंतु लोकांनी हार-जीत मान्य करून शांतता ठेवावी. वादग्रस्त पोस्ट करू नये, असे आवाहन पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे. जर कोणी अशा प्रकारच्या पोस्ट करतील तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. यावेळी अपर अधीक्षक सचिन पांडकर, पोलिस निरीक्षक देविदास गात, उपनिरीक्षक शैलेष जोगदंड, निशिगंधा खुळे, स्वाती लहाने यांच्यासह सर्व सायबर टीम उपस्थित होती.

सायबर पोलिसांना ६०० पेक्षा अधिक वादग्रस्त पोस्ट आढळून आल्या. त्यातील ५५० पोस्ट हटविण्यात आल्या आहेत. तसेच ३५० लोकांवर आतापर्यंत कारवाई केल्याचेही ठाकूर यांनी सांगितले.

व्हॉट्सप, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी समाज माध्यमांवर वादग्रस्त पोस्ट केल्याने पोलिसांकडून गुन्हे दाखल केले जात आहेत. गुरुवारपर्यंत हा आकडा २८ वर पोहोचला होता. यातील २४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट करणारे हे सर्वात जास्त सुशिक्षितच आहेत. यामध्ये पत्रकार, वकील, इंजिनिअर आदींचा समावेश आहे. दोन दिवसांपूर्वी अफवा पसरवलेल्या वकिलाला न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे.

मतमोजणी झाल्यापासून वातावरण दूषित झाले आहे. दोन समाजांत वाद होत आहेत. भावना दुखावणाऱ्या पोस्ट, अफवा पसरवून वाद घातले जात आहेत. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचेही ठाकूर म्हणाले.

सामान्य नागरिकांप्रमाणेच काही पोलिस अधिकारी, कर्मचारीही राजकीय नेत्यांचे स्टेटस ठेवत आहेत. तसेच वादग्रस्त मजकूर पोस्ट करत आहेत. यावरही ठाकूर यांनी सांगितले की जर असे निदर्शनास आले तर पोलिसांवरही कारवाई केली जाईल.

# विपरीत परिस्थितीतील निवडणूकीत शेवटपर्यंत दिला लढा

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

बीड लोकसभा निवडणुकीत उमेदवार म्हणून पक्षादेश येताच सर्वशक्तीनिशी रणांगणात उतरलेल्या पंकजाताई मुंडे या रणरागिणीने अतिशय विपरीत परिस्थितीतील निवडणुकीतही अखेरपर्यंत खंबीर लढा दिला. निसटता पराभव झाला असला तरी संपूर्ण महाराष्ट्रात व राजकीय क्षेत्रात दिलेल्या या लढ्याला वाखाणण्यात येत आहे. आज दिल्लीत देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही पंकजाताई मुंडे यांना बळ देत त्यांची पाठ थोपटली.

महाराष्ट्राच्या राजकारणातील बीडची लोकसभा निवडणूक प्रचंड लक्षवेधी ठरली. भाजपच्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या बजरंग सोनवणे यांच्या लढतीमुळे. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यापासून मतमोजणीच्या शेवटच्या फेरीपर्यंत ही निवडणूक साऱ्यांच्या नजरा खेचून घेणारी राहिली. ही निवडणूक सोपी नक्कीच नव्हती. मात्र, एवढ्या चुरशीच्या निवडणूकीतही पंकजाताई मुंडेंनी सन्मानजनक मते खेचून



**पंकजाताई मुंडेंच्या पाठीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींची कौतुकाची थाप**

आणली.प्रतिस्पर्धी उमेदवाराचा निसटता विजय झाला. दरम्यान, आज दिल्लीत एनडीए संसदीय पक्षाची बैठक होती.या बैठकीस पंकजाताई मुंडे उपस्थित होत्या. यावेळी भाजप व एनडीएतील बहुतांश सर्वच नेत्यांनी बीडच्या निवडणुकीत पंकजाताई मुंडेंनी अतिशय कठीण व विपरीत परिस्थितीतही मोठा लढा दिला याची वाखाणणी केली.एवढेच नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्यासाठी पंकजाताई मुंडे जेव्हा गेल्या त्यावेळी मोदींनी आशिर्वाद देत त्यांची पाठ थोपटली.

# दुष्काळ जाहीर करुनही २०२३ चा खरीप पिकविमा मिळाला नाही

## पिक कर्ज माफ केले नाही तसेच पिककर्जाचे पुर्नरगठनही केले नाही तर शेतकरी २०२४ च्या खरीपाची पेरणी कशी करणार -भाई विष्णुपंत घोलप

**पाटोदा । प्रतिनिधी**

सन २०२३ च्या खरीप हंगामात पावसाच्या खंडामुळे खरीप पिक जवळपास ८०% वाया गेली. शासनाने त्यावेळेस दुष्काळ जाहीर केला जी काही पिके आली ती काढणी आणि पेरणीला सुध्दा पुरली नाही. आज पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतकऱ्यांचा गेल्यावर्षीचा म्हणजे २०२३ चा खरीप पिकविमा किमान ८०% तरी शेतकऱ्यांना तात्काळ मिळाला पाहिजे तसेच पिक कर्जाचे नवे जुने करुन शेतकऱ्यांच्या पदरात काही सुध्दा पडत नाही.१०% पिककर्ज वाढुन म्हणजे बँकेला व्याजाची भरती करण्यासाठी मार्ग काढला आहे. मा.जिल्हाधिकारी साहेबांनी शेतकऱ्यांना



तात्काळ नवीन पिक कर्ज वाटप करण्यासाठी बँकांना आदेश द्यावेत आणि विमा कंपनीला सुचना देऊन २०२३ चा खरीप पिक विमा किमान सन २०२४ च्या खरीप पेरणीसाठी तरी तात्काळ द्यावा नसता शेतकऱ्यांचा मोठा उद्रेक होईल. शेतकरी खुप मोठ्या आर्थिक संकटात असल्यामुळे त्याला तात्काळ खरीप पेरणीसाठी मागील पिकविमा आणि नवीन पिककर्ज कोणताही विलंब न करता तात्काळ मिळावे.

या अगोदर भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री मुंडे साहेब आणि जिल्हाधिकारी,बीड यांना लेखी निवेदनाव्दारे वरील मागणी केलेली आहे. लोकसभा निवडणुकीमुळे वरील विषयाला जरी विलंब झाला असेल तरी आता केंद्रीय निवडणुक आयोगाने आचारसंहिता उठविली आहे. राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री आपल्या बीड जिल्ह्यातील असल्यामुळे वरील विषयाला गंभीरतेने घेऊन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक संकटातुन बाहेर काढण्याचा मार्ग मोकळा करावा असे लेखी निवेदनाव्दारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय,पाटोदा यांच्या मार्फत मा.जिल्हाधिकारी साहेब,बीड तसेच माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

# संविधान कॅलिग्राफी पोस्टर्स कार्यशाळा द्वारे राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

शिदोड येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रा. मिथुन जोगदंड ( संविधानदुत ) यांचे संविधान कॅलिग्राफी पोस्टर्स प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते " ज्याच्या मनगटात बळ, बुद्धी, चातुर्य आहे तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनु शकतो " हे विचार सांगणा-या राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त संध्याकाळी ८.०० वा अभिवादन करण्यात आले.

या ठिकाणी या कार्यक्रमासाठी निमंत्रक भाई आकाश निर्मळ , जेष्ठ नेत्या प्रा. सुशिला मोराळे,



पांडुरंग शेंडगे,आयोजक भाई प्रा. दत्ता प्रभाळे,वाल्मिक कदम, गोविंद निर्मळ , प्रा.नितीन गायकवाड,अंकुश गवळी या मान्यवरांच्या उपस्थितीत राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे शिवसंग्राम संघटनेचे डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते पुजन करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कोकाटे ज्ञानेश्वर, नवनाथ प्रभाळे, मुकुंद गोरे, गंगाधर निर्मळ आदी मान्यवरांबरोबरच गावातील प्रतिष्ठीत नागरीक, युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाई दत्ता प्रभाळे व युवकांनी परिश्रम घेतले. प्रा.मिथुन जोगदंड हे संपूर्ण महाराष्ट्रभर गेल्या दोन वर्षांपासून संविधान कॅलिग्राफी पोस्टर्स प्रदर्शनद्वारे संविधान जनजागृती अभियान राबविण्यात आहेत.प्रत्येक मूल्यांचे कॅलिग्राफी पोस्टर्स मार्फत संविधान समजते.दैनंदिन जीवनात आपण संविधानिक मुल्यांचा वापर करून आपण आपले जीवन आनंदमय सुखमय केले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

# नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व जिल्हा मेळाव्याचे माजलगांव येथे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ, बीड जिल्हा आयोजित नाभिक समाजातील इयत्ता १० वी, १२ वी आणि नीट परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये जसे डॉक्टर, इंजिनिअर, वकील, नागरी सेवा, शासकीय निमशासकीय नौकरी मिळवलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळा तसेच जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

मागील अनेक वर्षांपासून महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात येते. तसेच यावर्षीही गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन सोमवार, दिनांक १० जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता वैष्णवी मंगलू कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव (जि.बीड) येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांच्या शुभहस्ते स्वागत करण्यात येणार आहे. तर या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रदेश उपाध्यक्ष भगवानराव वाघमारे हे राहणार आहेत. तर यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश



कार्याध्यक्ष दामोदर काका बिडवे, प्रदेश सरचिटणीस पांडुरंग भवर, कर्मचारीछ महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष उत्तमराव सोलाणे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र भैय्या कावरे, बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास नाभिक समाजातील सर्व गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालक व नागरीकांनी या मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अनंत राऊत (केज), बीडचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे व महाराष्ट्र नाभिक कर्मचारी महामंडळाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डी.डी.राऊत व महाराष्ट्र नाभिक महामंडळाचेथ तालुकाध्यक्ष मधुकरराव सुरवसे (अंबाजोगाई) यांनी केले आहे.

# अवकाळी पावसाने सोलार पॅनल भुईजमा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील शेतकर्याचे गुरुवारी सायंकाळी अचानक आलेल्या अवकाळी पावसाने वादळात सोलार पॅनल मोडुन भुईजमा झाल्याची घटना घडली.

दिंद्रुड व परिसरात गुरुवारी दि.६ रोजी सुसाट्याचा वारा व विजाच्या कडकडाटात तुफान अवकाळी पाऊस पडला. झाडे उन्मळून पडली. शेतकरी मनोहर निळकंठराव ठोंबरे यांच्या गट नंबर ४७७ या शेतातील सोलार पॅनल अचानक आलेल्या अवकाळी पावसात भुईसपाट झाले, ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्याला मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागत असल्याने हळहळ व्यक्त होत असून महसूल



प्रशासनाने तात्काळ पंचनामे करत शेतकऱ्यास मदत करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चकलांबा पोलिस ठाणे जिल्ह्याच्या हद्दीत नाही का?

**पोलिस अधीक्षक साहेब दिवसा राक्षसभूवन मध्ये पन्नास हायवा भरल्या**

**गेवराई । प्रतिनिधी**

चकलांबा ठाणे दारांच्या अर्थप्रेमातून दिवसाच अवैध वाळू तस्करी होत आहे याला लगाम लावण्याऐवजी संरक्षणात हायवाव्दारे अवैध वाळूची तस्करी सुरू आहे आजच दूपारी एक हायवाने तिन जणांना जखमी केले असल्याची घटना असतानांच ( दि ७ जून रोजी ) राक्षसभूवनच्या गोदापात्रात साडेपाच वाजताच पन्नास हायवा एकामागे एक भरून जात आहेत.

याबाबद सविस्तर माहिती अशी की,चकलांबा पोलिस





ठाणे अंतर्गत येर्नाय़ा राक्षसभूवन या परिसरात चकलांबा ठाणे दारांच्या अर्थप्रेमातून वाळू माफिया दरोडा टाकण्याचे काम करत आहेत याला लगाम लावण्याऐवजी पोलिस संरक्षणात वाळूची अवैध वाहतूक सुरू आहे पोलिस अधीक्षक साहेब चकलांबा पोलिस ठाणे बीड जिल्ह्यात येत नाही का?असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जाऊ लागला आहे तसेच दिवसाच आपल्या स्वार्थासाठी ही तस्करी करनारे तसेच याला बळ देर्नाय़ा चकलांब्याच्या ठाणेदाराला भानावर आना अशी अपेक्षा आपणांकडून केली जात आहे.तसेच याबाबद कठोर पाऊले उचलून चकलांब्याला खमक्या अधिकारी यांची नेमणूक करा अशी मागणी जनसामान्यातून होत आहे.


# दुष्काळात तेरावा महिना..! शेतीची मशागतही महागली

## » शेत नांगरण्यासाठी २२०० रुपये एकरी खर्च

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

अलीकडे शेती करणे काही सोपे राहिलेले नाही, शेतीमध्ये दिवसेंदिवस उत्पादन खर्च वाढत आहे.याचाच प्रत्यय आता तालुक्यातील शेतकऱ्यांनायेत आहे.सध्या शेतीचे मशागतीचे मान्सुनपुर्व शेतीतील कामे प्रगतीपथावर आहे.नांगरणी, तिरी,रोटर,पाळी इत्यादी शेती मशागतीचे कामं जोरात सुरु आहे. शेतकरी बांधव यासाठी लगबग करताना बघायला मिळत आहे.

मात्र गेल्या अनेक दिवसांपासून इंधनाच्या दरात होत असलेली भरमसाठ वाढ यामुळे शेतीची पूर्वमशागत आता महागले असल्याचे चित्र तालुक्या



बघायला मिळत आहे.यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. पूर्व मशागतीच्या खर्चात होणारी

**ट्रॅक्टरने मशागत करण्याचे भाव रोटर-१२००/पेरणी-११००,पाळी-१०००/प्रती एकरी भाव; एकंदरीत डिझेलचे दर वाढल्याने मशागत खर्च वाढला**

भरमसाठ वाढ शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री बसवत असल्याने शेतकरी मोठा संताप व्यक्त करीत आहेत.आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे गेल्या वर्षी खुप मोठे नुकसान झाले आहे, आणि आता येणाऱ्या खरिपात देखील यामुळे मोठे नुकसान होऊ शकते म्हणून दुष्काळात तेरावा महिना अशी परिस्थिती तालुक्यात बघायला मिळत आहे.

राज्यात सर्वत्र डिझेलचे दर शंभर रुपयांच्या घरात गेले आहेत आणि यामुळेच शेतीची पूर्वमशागत महागली असल्याचे सांगितले जात आहे.तालुक्यात सध्या शेतीची पुर्व मशागतीचे कामे करण्यासाठी ट्रॅक्टरला नांगरणीसाठी एकरी २२००/ रुपये खर्च येत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. शेतीच्या पूर्वमशागत व्यतिरिक्त डिझेलच्या वाढत्या दरामुळे शेतमालाची वाहतूकही महागली आहे त्यामुळे शेतकरी बांधवांना दुहेरी फटका बसत आहे.

शेतकरी बांधव शेतीची पूर्व मशागत करण्यात व्यस्त आहेत.उन्हाळ्यात शेताची नांगरणी झाल्यास मृगनक्षत्र पर्यंत शेत चांगले उन्हात तळले जाते यामुळे जमिनीत असलेले विषाणू मरून जातात तसेच पावसाचे पाणी सरळ जमिनीत मुरते.मागील वर्षी ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करण्यासाठी शेतकरी बांधवांना १८०० एकरी खर्च येत होता,सध्या हाच खर्च २२०० रुपये एवढा झाला आहे.

एकंदरीत निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करणारा शेतकरी डिझेल दरवाढीमुळे हतबल झाला आहे. सुलतानी दडपशाही आणि अस्मानी संकट या दुहेरी कात्रीत शेतकरी राजा पूरता भरडला जात आहे.

नांगरणीसाठी ऊसाचे वावर असल्यास २५०० रुपये एकरी खर्च लागत आहे.इतर पिकांचे वावर असल्यास शेतकऱ्यांना एकरी २००० ते २२०० रुपये खर्च येत असल्याचे सांगितले जातं आहे. एकंदरीत डिझेलचे दर वाढल्याने मशागत खर्च वाढला असल्याचे सांगितले जात आहे.यामुळे निश्चितच शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात भर पडणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गर्भलिंग निदान रोखण्यासाठी राज्यात वर्षात ७१ स्टिंग ऑपरेशन

**पुणे । प्रतिनिधी**

बेकायदेशीर गर्भलिंग निदानाचे गैरप्रकार रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे कडक कारवाई केली जाते. आरोग्य विभागातर्फे १ एप्रिल २०२३ ते ३० मार्च २०२४ या कालावधीत राज्यात ७९ ठिकाणी स्टिंग ऑपरेशन करण्यात आली. यामध्ये ७ ठिकाणी कारवाई करण्यात यश मिळाले. कोल्हापूरमध्ये ३, छत्रपती संभाजीनगरमध्ये २, धाराशिवमध्ये १ आणि बीडमध्ये १ अशा केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे.



प्रसूतीपूर्व निदान तंत्राचा वापर करून बेकायदेशीररीत्या गर्भलिंग निदान करणे, गर्भपात करणे शिक्षेस पात्र आहे. मुलीचे प्रमाण मुलांच्या तुलनेत कमी होत असताना या सामाजिक समस्येकडे सर्वांनी गांभीयनि लक्ष देण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. नुकतेच छ. संभाजीनगर येथील बेकायदेशीर गर्भलिंग निदानाचे प्रकरण समोर आले.

### प्रलंबित प्रकरणांची संख्या जास्त

राज्यात एका वर्षात २ अधिकृत केंद्रे आणि ४ अनधिकृत केंद्रे सील करण्यात आली आहेत. राज्यातील सर्व पौसीपीएनडीटी आणि एमटीपी केंद्रांची त्रैमासिक तपासणी केली जात आहे. अनधिकृत केंद्रांवर कारवाई करून न्यायालयात खटला दाखल केला जातो. मात्र, न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या लक्षणीय आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाकडे दोन वर्षात १० प्रकरणे वर्ग करण्यात आली. ती सर्व प्रकरणे प्रलंबित असून, एकाचाही निकाल लागलेला नाही

या पार्श्वभूमीवर तेथील जिल्हाधिकाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सोनोग्राफी केंद्रात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ चे उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यास, तसेच असे कृत्य करण्याची जाहिरात करणा-यांची तक्रार आरोग्य विभागाच्या टोल फी. क्र. १८०० २३३ ४४७५ किंवा १०४ या क्रमांकावर नागरिकांनी नोंदवावी. या बाबीची खातरजमा करून संबंधित सोनोग्राफी केंद्रावर, व्यक्तीवर न्यायालयीन प्रकरण दाखल केले जाते, अशी माहिती अतिरिक्त संचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी दिली.

# आमदार थोपटे आंदोलनावर ठाम

**भोर, । प्रतिनिधी**

''मतदानापूर्वी मतदारांनी पैसे वाटल्याच्या तक्रारीवर पोलिसांनी रीतसर गुन्हा दाखल करून कारवाई केली नाही, तर आम्ही पोलिस ठाण्यासमोर आंदोलन करण्यास ठाम आहे,'' असे महाविकास आघाडीच्यावतीने आमदार संग्राम थोपटे यांनी पुन्हा एकदा शुक्रवारी (ता. ७) घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठणकावून सांगितले. तसेच, महायुतीच्यावतीने जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरे यांनी केलेल्या आरोपांचे खंडनही केले.



आमदार थोपटे म्हणाले, ''महायुतीच्यावतीने पत्रकार परिषद घेऊन माझ्यावर राजकीय स्टंटबाजी करण्याचा आरोप केला. हे त्यांचे अज्ञान असून, ते राजकीयदृष्ट्या अपरिपक्व आहेत. मूळ मुद्दा बाजूला ठेवून ते भोर शहरातील अवैध धंद्याबद्दल आणि बांधकामाबद्दल बोलत आहेत. आम्ही कोणत्याही अवैध व्यवसायाला पाठीशी घालत नाही. तालुक्यातील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रभागात खासदार सुप्रिया सुळे यांना मताधिक्य मिळाले. त्यामुळे ते वरिष्ठांना आपले राजकीय अस्तित्व दाखविण्यासाठी चिखलफेक करीत आहेत. पोलिसांनी मावळ तालुक्यातील गाड्या भोरमध्ये कशासाठी आल्या? कुठे थांबल्या आणि त्यांनी कोणाकोणाला फोन केले? याची चौकशी करावी, अशी आमची मागणी आहे.''

''भोरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक यशवंत डाळ यांनी शहरात अवैध बांधकामे केलेली आहेत. त्यांना नगरपालिका प्रशासनाने नोटीसही दिलेली आहे. परंतु, तेच आता अवैध बांधकामावर बोलून जनतेचे लक्ष विचलीत करण्याचा प्रयत्न करत आहेत,'' असे आमदार थोपटे यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष रवींद्र बांदल, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शैलेश सोनवणे, मानसिंग धुमाळ, विठ्ठल शिंदे, संदीप नांगरे, विठ्ठल आवाळे, बाळासाहेब थोपटे, सचिन हर्णसकर, गणेश पवार, समीर सागळे, सुमंत शेटे आदी उपस्थित होते.

## नाल्यांचे पुनरुज्जीवन शक्य; नाला पुनरुज्जीवन चर्चासत्र

**पुणे । प्रतिनिधी**


नाल्यांचे नैसर्गिकरित्या सुशोभीकरण, पाणी स्वच्छता, दुर्गंधी मिटविणे, डासांची पैदास रोखणे व परिसरातील जैवविविधता सुधारणे महत्त्वाचे आहे. यातूनच नाल्यांचे पुनरुज्जीवन शक्य आहे. नाल्यांचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करताना घरे, सोसायट्यांमधून नाल्यात पडणारे सांडपाणी स्वच्छ करण्याबरोबर घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे, डोंगरातून येणाऱ्या पाण्यासाठी पुरेशी जागा करून देणे, पाण्याचा प्रवाह नियमित करणे, नाल्याकाठी झाडे लावून नाल्यांमध्ये काही प्रवाह तयार करणे हे पर्यावरणासाठी आवश्यक आहे, असे मत तज्ज्ञांनी 'नाला पुनरुज्जीवन' चर्चासत्रात व्यक्त केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज व आयजीबीसी पुणे चॅप्टर यांच्या वतीने 'पर्यावरणीय नाला पुनरुज्जीवन' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात 'सृष्टी इको रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या सायली जोशी व 'इकोसत्व सोल्युशन्स'च्या मेधावी राजवाडे या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी विविध पर्यावरणप्रेमी, इंजिनिअर, महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी, सामाजिक संस्था, सल्लागार व विविध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच पुणे महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

# सदाशिव पेठेतील शैक्षणिक संस्थेत भीषण आग! वसतिगृह व्यवस्थापकाचा होरपळून मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

सदाशिव पेठेतील एका शैक्षणिक संस्थेच्या कार्यालय व वसतिगृहाला लागलेल्या आगीत वसतिगृह व्यवस्थापकाचा होरपळून मृत्यु झाला. अग्निशामक दल वेळेत पोचल्याने वसतिगृहातील ४० विद्यार्थीनींची सुटका होऊ शकली, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. ही घटना गुरूवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास घडली. आगीचे कारण अद्याप समजू शकले नाही.



**४० विद्यार्थीनी थोडक्यात बचावल्या**

सदाशिव पेठेतील वाणिज्य विषयक अभ्यासक्रमाचे शिक्षण देणारी संस्था आहे. या संस्थेची तीन मजली इमारत आहे. तेथेच विद्यार्थीनींना राहण्यासाठी वसतिगृहाची सुविधा देण्यात आली आहे. दरम्यान, गुरूवारी मध्यरात्री दीड वाजता संबंधित संस्थेला आग लागली. काही वेळातच आगीच्या झळा वसतिगृहाच्या खोल्यांपर्यंत पोचल्या. आगीच्या झळा व धुरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या घटनेची माहिती अग्निशामक दलास मिळताच, दलाचे तीन बंब, टँकर, रेस्क्यू व्हॅन घटनास्थळी पोचले. तर वसतिगृहामध्ये विद्यार्थीनी अडकल्याची माहिती अग्निशामक दलास मिळाली.

जवानांनी आगीच्या ठिकाणी पाण्याचा मारा सुरू करून अर्ध्या तासात आग आटोक्यात आणली. त्याचवेळी ४० विद्यार्थीनींची सुखरूप सुटका केली. आग नियंत्रणात आल्यानंतर शोध घेताना संस्थेच्या कार्यालयातच झोपलेले व्यवस्थापक राहूल कुलकर्णी यांचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याचे जवानांना आढळून आले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी ससून रुग्णलयात पाठविला. अग्निशमन दलाचे केंद्रप्रमुख संजय रामटेके यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी ही आग आटोक्यात आणली. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त संदीपसिंग गिल, परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम, विश्रामबाग पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक दीपाली भुजबळ यावेळी उपस्थित होत्या.

# जिल्ह्यात हिवताप निर्मुलन मोहीम

**काटेवाडी । प्रतिनिधी**

हिवताप निर्मुलन आणि शून्य हिवताप रुग्ण हे उद्दिष्ट २०२७ पर्यंत साध्य करण्यासाठी 'हिवताप निर्मूलन अभियान' लोकसहभागातून राबविण्यात येणार आहे. दरवर्षी जून महिना हा 'हिवताप प्रतिबंध महिना' म्हणून पाळला जातो. तो राबवीत असताना नागरिकांना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व पटवून देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी अपर्णा पाटील यांनी दिली.

हिवतापामुळे दरवर्षी अनेकांना जीव गमवावा लागतो. हिवताप, डेंगी, चिकनगुन्या, हत्तीरोगसारखे आजार डास चावल्यामुळे होतात. अशा आजारांपासून दूर राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात, घरात डासांची निर्मिती होवू नये म्हणून काळजी घेणे आवश्यक आहे. किटकजन्य आजारांचा प्रसार करणाऱ्या डासांची उत्पत्ती साचलेल्या पाण्यात होत असते. डास साचलेल्या पाण्यात अंडी घालतो. ८ ते १० दिवसात नवीन डास जन्माला येतो. हा डास आजारी व्यक्तीला (रुग्णास) चावल्यास रुग्णाच्या शरीरातील जंतू डासाच्या शरीरात जातात. तेथे त्यांची वाढ होते आणि त्यानंतर हा डास ज्या निरोगी व्यक्तींना चावेल त्यांना डेंगी, चिकनगुन्या आणि हत्तीरोग यांसारखे आजार होतात.

## घटस्फोटाचा दावा तीन तारखांत निकाली

पुणे : कौटुंबिक वादातून सोबत राहण्याची इच्छा नसलेल्या प्रकरणात संमतीने दाखल केलेला घटस्फोटाचा दावा तीन तारखांत निकाली काढण्यात आला. प्रकरणाचे गांभीर्य तसेच परिणामांबाबत पक्षकारांशी चर्चा करून समेट घडवून हा दावा मिटला. याबाबत सविस्तर माहिती अशी की, आशा आणि अक्षय (दोघांची नावे बदललेली) असे घटस्फोट झालेल्या जोडप्याचे नाव आहे. दोघांचाही हा दुसरा विवाह होता. त्यांना दोन मुले आहेत. कौटुंबिक वाद आणि स्वभाव भिन्नतेमुळे त्या दोघांना एकत्र राहणे शक्य नव्हते. त्यामुळे अक्षय याने आशाविरुद्ध रायगड येथे घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. त्या प्रकरणात आशा या वकिलांमार्फत हजर झाल्या होत्या. तर आशा यांनी अक्षय यांच्याविरोधात कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दिली होती. या दोन्ही प्रकरणात अक्षय यांच्यातर्फे ॲड. राजेंद्र कदम यांनी बाजू मांडली. आशा यांच्यावतीने ॲड. राणी कांबळे सोनवणे यांनी युक्तिवाद केला.

# जैववैद्यकीय कचरा निर्मूलनाकडे रुग्णालयांचे दुर्लक्ष; उघड्यावर कचरा टाकण्याच्याही घटना

**पिंपरी । प्रतिनिधी**

मोशी येथील सामायिक जैववैद्यकीय कचराप्रक्रिया केंद्रात सध्या दररोज ३ टन जैववैद्यकीय कचर्यावर (बायोमेडिकल वेस्ट) प्रक्रिया केली जात आहे. महापालिकेकडून ही व्यवस्था करण्यात आलेली असताना काही खासगी रुग्णालये त्याकडे सर्रास दुर्लक्ष करीत आहेत. यापूर्वी उघड्यावर बायोमेडिकल वेस्ट टाकण्याच्या घटनादेखील उजेडात आलेल्या आहेत.



वाहनांची संख्या अत्यल्प

महापालिकेच्या वतीने पास्को इन्व्हर्न्मेंटल सोल्युशन या कंपनीच्या सहकार्याने शहरातील रुग्णालये व दवाखान्यांमध्ये दररोज निर्माण होणारा जैववैद्यकीय कचरा गोळा केला जातो. तब्बल ६२५ रुग्णालये आणि २ हजार ७०० दवाखाने हे त्यासाठी नोंदणीकृत आहेत. दररोज सुमारे ३ टन इतका कचरा गोळा केला जात आहे. ५ वाहनांमार्फत हा कचरा गोळा होत आहे. शहरातील रुग्णालये व दवाखान्यांची नोंदणीची संख्या लक्षात घेता बायोमेडिकल वेस्ट गोळा करण्यासाठी असलेल्या वाहनांची संख्या अत्यल्प आहे.

महापालिकेच्या पिंपरी-संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) दररोज २ टन जैववैद्यकीय कचर्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता असणारे केंद्र होते. हे केंद्र २०२२ मध्ये बंद करण्यात आले. दरम्यान, मोशी येथील जागेत ऑगस्ट २०२३ मध्ये १७.९ टन प्रतिदिन क्षमतेचे सामायिक जैववैद्यकीय कचराप्रक्रिया केंद्र सुरू केले. पुढील १२ वर्षांचा विचार करून संबंधित केंद्राची क्षमता वाढविली आहे. बायोमेडिकल वेस्ट गोळा करण्यासाठी सध्या रुग्णालयांकडून प्रतिदिन प्रतिबेडसाठी (खाटा) ८.१६ रुपये हा दर आकारला जात आहे. तर, दवाखान्यांसाठी ४ हजार ३९ रुपये इतके वार्षिक शुल्क घेण्यात येत आहे. २०३५ पर्यंत या कामासाठी मुदत दिलेली आहे.

बायोमेडिकल वेस्टचे निर्मूलन करण्यासाठी प्रामुख्याने दोन प्रक्रियांचा वापर

केला जातो. इन्सनरेशन आणि ऑटोक्लेव्ह यांचा त्यामध्ये समावेश आहे. शहरातील रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये निर्माण होणारा जैववैद्यकीय कचरा (बायोमेडिकल वेस्ट) उघड्यावर टाकला जाऊ नये म्हणून महापालिकेच्या वतीने अशाप्रकारे उघड्यावर कचरा टाकणारी रुग्णालये आणि दवाखान्यांना दंडदेखील केला जात आहे, अशी माहिती वैद्यकीय विभागातील सूत्रांनी दिली. दरम्यान, याबाबत महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्याशी संपर्क साधला. मात्र, ते उपलब्ध झाले नाही.

जैववैद्यकीय कचरा म्हणजे काय ?

जैववैद्यकीय कचरा म्हणजे, जो रुग्णालयात आणि प्रयोगशाळेत उत्पन्न होतो. तसेच, जो आपल्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. जैववैद्यकीय कचरा हा स्थायी व द्रव स्वरुपी असतो.

# जुनी सांगवी-बोपोडी पूल पावसाळ्यानंतरच सुरू होणार

**पुणे । प्रतिनिधी**

जुनी सांगवी ते बोपोडीला जोडणाऱ्या नवीन पुलाचे काम पूर्ण होऊन हा पूल सुरू होण्यासाठी आता पावसाळा उजाडणार आहे. मागील अडीच वर्षांपासून पुलाचे काम सुरू असून, अद्यापही काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे पावसाळा संपल्यानंतर तरी हा पूल लोकांच्या सेवेसाठी सुरू होणार का? असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांतील लोकसंख्या व प्रवाशांची संख्या वाढत असल्याने सध्या उपलब्ध असणाऱ्या पुलांवरही ताण येऊ लागला आहे. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून जुन्या सांगवीतील ममतानगर, दत्त आश्रम ते बोपोडीतील औंध रस्त्याला (जयकर पथ) जोडणारा पूल २०२२ मध्ये उभारण्यास सुरुवात झाली. पिंपरी-चिंचवड महापालिका संबंधित पुलाचे काम करत आहे. मार्च २०२३ पर्यंत या पुलाचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, वेळेत काम पूर्ण न झाल्याने कामाला मुदतवाढ घेण्यात आली होती.

डिसेंबर २०२३पर्यंत या पुलाचे काम पूर्ण होण्याची अपेक्षा होती. आता पुलाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, त्या भोवतीचे जोड रस्ते, पुलाची लोड टेस्टिंग यांसारखी कामे शिल्लक आहेत. सांगवीतील ममता नगर येथील १८ मीटर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम अद्याप बाकी आहे. बोपोडीकडील बॉटनीकल गार्डनच्या बाजूला चौक विकसित करण्याचे काम व्हायचे आहे. त्यानंतर पुलाची लोड टेस्टिंग पूर्ण होईल. या सर्व कामांसाठी आणखी तीन महिन्यांचा कालावधी लागेल. त्यानंतर हा पूल सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला केला जाणार आहे.सध्या हिंजवडी, वाकड, पिंपळे गुरव, सांगवी येथून येणाऱ्या वाहनचालकांना पुणे स्टेशन, येरवडा, लष्कर परिसरात जाण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, औंध रस्ता, सांगवीमार्गे पुढे जावे लागते. हा पूल पूर्ण झाल्यास संबंधित वाहनचालकांना पडणारा मोठा वळसा वाचणार आहे.

## विभागस्तरीय महिला लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात आल्याने दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा विभागस्तरीय महिला लोकशाही दिन माहे जून २०२४ पासून नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती महिला व बाल विकास विभागीय उपआयुक्त संध्या नगरकर यांनी कळविली आहे. विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पीडित महिलांच्या तक्रारी, अडचणींची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी तसेच महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा दुसऱ्या सोमवारी विधान भवन, पुणे येथे विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते, असेही श्रीमती नगरकर यांनी कळविले आहे.

# परवानाधारक एजन्सीकडून अनधिकृत होर्डिंग; फौजदारी गुन्हा दाखल करून महापालिका सुस्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिकेकडून परवाना घेतलेल्या अधिकृत एजन्सीकडूनच शहरात अनधिकृत जाहिरात होर्डिंग उभारले जात आहेत. ही बाब महापालिकेच्या सर्वेक्षणातून समोर आली आहे. अनधिकृत होर्डिंग उभे करून लाखोंचे उत्पन्न मिळविणार्या या एजन्सीवर महापालिकेने केवळ फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. त्या एजन्सीवर कठोर कारवाई करून काळ्या यादीत समाविष्ट करण्याची मागणी जोर धरत आहे.

घाटकोपर, मुंबई येथे मे महिन्यात १३ तारखेला २५० टन वजनाचे जाहिरात होर्डिंग कोसळून १७ जणांचा बळी गेला. तर, अनेक जण जखमी झाले. त्यानंतर राज्य शासनाच्या आदेशानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील अनधिकृत, नियमबाह्य आणि धोकादायक जाहिरात होर्डिंगचे सर्वेक्षण केले. त्यात तब्बल २४ जाहिरात होर्डिंग अनधिकृत असल्याचे उघड झाले. तर, तब्बल ३७२ होर्डिंग वाढीव आकाराचे आणि अधिक उंचीचे असल्याचे आढळून आले आहेत.




अनधिकृत होर्डिंग उभारण्यात परवानाधारक जाहिरात एजन्सीदेखील मागे नाहीत. या सर्व अनधिकृत होर्डिंगवर महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली आहे. काही होर्डिंग महापालिकेने पाडले तर, काही होर्डिंग एजन्सीने स्वत: काढून घेतले. त्या एजन्सी, होर्डिंगधारक, होर्डिंगचालक व जागामालकांवर महापालिकेने पोलिसात गुन्हा दाखल केला. पोलिस तपासानंतर त्यांच्यावर कारवाई होऊ शकते किंवा ते कायद्याचा आधार घेऊन निर्दोष ठरू शकतात. शेकडो टन वजनाचे होर्डिंग कोसळून नागरिकांचा नाहक जीव जात आहे. तसेच, वित्तहानी होत आहे. मात्र, परवानाधारक होर्डिंग एजन्सींकडून अनधिकृतपणे होर्डिंग लावून जाहिरातीचा 'धंदा' केला जात आहे. महापालिका त्यांच्यावर फुटकळ कारवाई करते. पोलिसांत तक्रार दाखल करून समाधान मानत आहे. त्यात त्या परवानाधारक एजन्सीवर कोणतीही कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. नियमभंग करून नागरिकांच्या जीवाशी खेळणार्या अशा एजन्सीवर कठोर कारवाई करीत, त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्याची मागणी होत आहे. तसेच, आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या परवाना निरीक्षकांवरही कारवाई होणे अपेक्षित आहे. त्याबाबत आयुक्तांनी केवळ कागदी आदेश देऊन गप्प न बसता, ठोस कारवाईची अपेक्षा केली जात आहे.

## बँक अधिकाऱ्याकडून महिला कर्मचाऱ्यासोबत असभ्य वर्तन

**पुणे । प्रतिनिधी**

बँकेत शिपाई म्हणून काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यासोबत असभ्य वर्तन करून बँक अधिकाऱ्याने तिचा विनयभंग केला. हा प्रकार मागील तीन महिन्यापासून सुरू होता. याप्रकरणी बँक अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४३ वर्षीय महिलेने बंडगार्डन पोलिस ठाण्यात बुधवारी (ता. ५) फिर्याद दिली आहे. त्यावरून बँक अधिकारी नयनेश वाजकर मोनं (वय ५०) याच्यावर विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बंड गार्डन भागातील एका राष्ट्रीय बँकेत शिपाई म्हणून काम करतात. तर आरोपी नयनेश मोनं हा बँकेत वरिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत आहे.

फिर्यादी महिला बँकेत काम करत असताना एक महिन्यापूर्वी आरोपीने महिलेसोबत असभ्य वर्तन करून त्यांच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला. तसेच याबाबत कुठे तक्रार केली तर बघून घेईन अशी धमकी दिली. २८ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास आरोपीने फिर्यादीच्या व्हॉट्सअप क्रमांकावर व्हॉइस कॉल केला. महिलेसोबत अश्लील भाषेत बोलून तिच्या मनात लज्जा निर्माण होईल, असे कृत्य केले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक चेतन धनवडे करत आहेत.